## श्री साईलीलास

श्री साईलीलाच्या सप्टेंबर-ऑक्टोबर, १९९२च्या अंकातील 'वाजे नगारा' या लेखमालेतील 'सेतुबंध' हा भाग मला अतिशय आवडला. मीही त्याच विषयाचा अभ्यासक, चिकित्सक असून 'श्री साईलीला'चा नियमित वाचक आहे.

**– श्री. गि. अ. अडावदकर,**
धुळे.

'श्री साईलीला'च्या सप्टेंबर-ऑक्टोबर, १९९२च्या अंकातील लेख वाचून चांगला बोध झाला. हा अंक सारखा वाचून त्यातील बाबांचे बोल मी भारूडातून लोकांपर्यंत पोहचवतो. असेच मार्गदर्शन पुढील अंकांतूनही मिळत राहील, अशी आशा आहे.

**– श्री. रघुनाथ सांडभोर**
दत्तवाडी, पुणे.

मी 'श्री साईलीला'चा सभासद असल्यामुळे 'श्री साईलीला'चा नोव्हेंबर-डिसेंबर, १९९२चा अंक वाचला. विशेषत: श्री. ग. रा. सावंत यांचा ज्योतिष्यविषयक लेख उत्तमच वाटला. तसेच 'वाजे नगारा' हा लेख खूपच लक्षवेधी आहे. धार्मिक ज्ञान मिळवू इच्छिणाऱ्यांसाठी 'श्री साईलीला' ही ज्ञानगंगाच आहे. 'श्री साईलीला'चे महत्त्व असेच उत्तरोत्तर वाढत राहो व असेच उच्च दर्जाचे लिखाण वाचायला मिळो, हीच श्री साईचरणी प्रार्थना.

**– श्री. सुरबा ज. गडेकर**
चेंबूर, मुंबई.

'श्री साईलीला'चे अलिकडील अंक खूपच आवडले. त्याबद्दल संपादकांचे अभिनंदन. 'श्री साईलीला'चे महत्त्व असेच कायम वाढत राहो व चांगले लेख आम्हाला वाचायला मिळो, ही श्रींच्या पायी प्रार्थना.

**– श्री. आर. एच्. मद्रेवार**
चाकूर, लातूर.

गेल्या चार वर्षांपासून मी व माझ्या घरातील मंडळी 'श्री साईलीला'चे अंक आवडीने वाचत आलो आहोत. अंक येण्यास थोडा जरी उशीर झाला तरी मन बेचैन होते. अंक पाहून व वाचून 'श्री साईलीला'ची मी सभासद झाल्याचा मला फार अभिमान वाटतो.

**– सौ. आशाताई गोंडबोले**
कन्हान, नागपूर.

आपल्या संपादकत्वाखाली निघणारे 'श्री साईलीला'चे अंक काहीसे आगळे-वेगळेच म्हणावे लागतील. साईंचे अनुभव अंकात पोथी-टाइप आडवे छापण्याची पद्धत सुंदर वाटली. कविता पानापानावर द्याव्यात. त्या एकाच ठिकाणी नसाव्यात.

**– श्री. भालचंद्र गन्द्रे**
चेंदणी, ठाणे (प.).

मी 'श्री साईलीला'चा सभासद असून सदर मासिक नेहमी वाचतो. त्यातील मोहनलाल अग्रवाल यांची 'वाजे नगारा' ही लेखमाला मला फार आवडते. एक सूचना कराविशी वाटते की अंकात लेख थोडक्यात असावेत व अधिकाधिक लेखकांना बाबांबद्दल लिहीण्यास संधी द्यावी.

**– श्री. जैतू मुढोळकर**
रायते, ठाणे.

'श्री साईलीला'मध्ये नवीन लेखमाला आपण सुरु केल्या आहेत. परंतु ते करीत असताना जुन्या चांगल्या सदरांना काटछेद द्यायला नको होता. 'साईभक्तांचे अनुभव', 'जुन्यातलं सोनं' आदी पूर्वीची सदरे पुन्हा सुरू करावीत, ही विनंती.

**– श्री. र. वि. नूलकर,**
**श्री. प्र. वा. चांदोरकर,**
**श्री. श्री. बा. आठवले,**
पौंड रस्ता, पुणे.

मी 'श्री साईलीला'चा सभासद असून अंक नियमित वाचत असतो. सप्टेंबर-ऑक्टोबर, १९९२चा अंक फारच छान होता. आपण संपादक झाल्यापासून नवीन नवीन माहिती मिळू लागली आहे.

**– श्री. अविनाश पाध्ये**
बोरिवली (प.), मुंबई.

'श्री साईलीला'चा सप्टेंबर-ऑक्टोबर, १९९२चा अंक वाचला. त्यामधील पंडित ग. रा. सावंत यांच्या 'तुमचं नशीब तुमच्या हातात' या क्रमश: प्रसिद्ध होत असलेल्या लेखमालेतील लेखात हस्तसामुद्रिक शास्त्राची माहिती फारच सुरेख दिलेली आहे.

**– श्री. रवींद्र मेहेत्रे**
कोपरगाव, अहमदनगर.

'श्री साईलीला'चे नवीन स्वरूप आकर्षक आणि नूतन आहे. 'वाजे नगारा' सारखी लेखमाला वाचल्यावर बुद्धीला नवीन काहीतरी वाचल्याचा आनंद होतो. प्रत्येक लेख शास्त्रपूर्ण असतात. त्याबद्दल संपादकांचे आभार! हल्लीच्या काळात आध्यात्मिक गोष्टींबाबत अज्ञान, गैरसमज आहे. विज्ञानाचे (शास्त्र) स्वरूप दिवसेंदिवस वाढत आहे. प्रत्येक लेख किंवा मुद्दा विज्ञानाच्या भाषेत स्पष्ट करावा, ही विनंती. त्याबाबतीत श्री. अरुण ताम्हणकरांनी काही लेखांत तशी उकल करून दाखवलेली आहे. या क्षेत्रातील त्यांचा अभ्यास व पटवून सांगण्याची हातोटी निश्चितच मोठी आहे. दयाळू श्री बाबांचे अनेक जातीधर्मांतील ज्ञानी व अज्ञानी, सामान्य व असामान्य भक्त आहेत. त्या सर्वांना श्रींच्या कृपेचे अनुभव येत असतात. असे कृपेचे अनुभव सर्वांनाच शब्दरूपात स्पष्ट करता येत नाहीत किंवा शब्दसौंदर्य आणि मर्यादा यांचा ह्या लेखांमध्ये अभाव असल्याने ते मासिकात प्रकाशित होण्याच्या कसोटीला उतरत नसतीलसुद्धा! तरीपण योग्य बदल करून आपण सर्व अनुभव प्रकाशित करावेत, ही विनंती. आपल्या धर्मग्रंथांत विपुल ज्ञान भरलेले आहे. गीता, ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांमध्ये काळाला अनुसरून अभ्यास करणाऱ्याला वेगवेगळा अर्थ सापडतो. गीता, ज्ञानेश्वरीवरील भाष्ये

भरपूर आहेत. त्यांची गोडीही नित्य नूतन आहे, अवीट आहे. एखाद्या ओवीवर दोन- दोन तास निरूपण करणारे भक्त आहेत. शक्य झाल्यास क्रमाक्रमाने एक-एक ओवी घेऊन त्यावरील निरूपण प्रकाशित करावे.

तसेच, श्री बाबांच्या सत्‌चरिताचे वाचन करणाऱ्याला अनेक अडचणींवर उत्तर मिळत असते. तरीसुद्धा काही प्रसंगी भक्तिमार्गात अनेक शंका-कुशंका निर्माण होत असतात. त्यावर योग्य मार्गदर्शन सुदैवाने कोणासच मिळते. तरी कृपया, एखाद्या अधिकारी भक्ताने 'शंका-समाधान' करावे, ही प्रार्थना.

–श्री. श्रीकृष्ण फाटक
मठ, सिंधुदुर्ग.

## श्री साईभक्तांना नम्र आवाहन

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाच्या वतीने विविध विकास योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. ह्या योजनांसाठी विशेष स्वरूपाच्या देणग्या स्वीकारण्यात येत आहेत. यासंबंधीची माहिती पुढीलप्रमाणे :

'साईबाबा भक्तनिवास' या इमारतीचे बांधकाम जोरात चालू असून रु. ५०,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील एका खोलीला देण्यात येईल. रु. २,००,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील जनरल हॉलला देण्यात येईल. ह्या देणगीदारांना वर्षातून दोनदा आगाऊ एक महिना कळविल्यास तीन दिवस रहाण्यासाठी विनामूल्य जागा देण्यात येईल.

मंदिर-नूतनीकरणासाठी रु. १,००,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

रुग्णालय-विस्तारीकरणासाठी रु. ५,००,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव एका वॉर्डला अगर ऑपरेशन थिएटरला देण्यात येईल. रु. २०,०००/- देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव एका बेडला देण्यात येईल. रु. १०,०००/- अगर त्याहून अधिक देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी प्रकाशित

## फोटोंची यादी

| क्र. | फोटोचे नाव | साईज | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.२५ |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | ४'' x ५'' | ०.२५ |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' x ३'' | ०.१० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' x २०'' | २.२५ |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' x १४'' | १.२० |
| ६. | द्वारकामाई (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १४'' x २०'' | २.२० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | १०'' x १४'' | १.१० |
| ९. | मूर्ती (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.४० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| १२. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.६० |
| १३. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.२५ |
| १४. | पालखी (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.६५ |
| १५. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' x २०'' | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ७.०० आहे.

**पुस्तके आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :–**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३ १०९.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४.

(पृष्ठ क्र. १९ वरून)

बाबांचे व तात्याचे मामा-भाच्याचे नाते मानले जात होते. त्यामुळे तर त्याच्याशी बाबांच्या खोड्यांना ऊतच येत असे. त्याला गुदगुल्या करणे, त्याच्याबरोबर फुगड्या खेळणे, कुस्ती खेळणे वगैरे हैदोस-धुल्ला नेहमीच असावयाचा. त्याचप्रमाणे अ. ३६ मध्ये आपला लाडका भक्त शाम्याचा बाबांनी घेतलेला गालगुच्चा तर आपणा सर्वांना ठाऊकच आहे.

कोणाशी बोलताना, गोष्टी सांगताना, रोग बरा करताना व उपदेश करतानाही बाबा सदा हसत व विनोद करीत असत. जणूकाय त्यांचे म्हणणे होते की संसारात दुःखे व संकटे तर नेहमीच येत असतात; मग आपण उगाच रडत दुर्मुखलेले चिंताग्रस्त होऊन आणखी दुःखी का बरे व्हावे!

**फिकीर न करावी यत्किंचित।**
**सदा असावें आनंदभरित।**
**चिंता न करावी आमरणान्त।**
**उपदेश नित्य बाबांचा॥११३॥**

–अध्याय १७

बाबांचा विनोद खरोखरीच अलौकिक होता. अभिनयासह मिश्किलपणे हसून ते अगदी नेमक्या शब्दात व नेमक्या प्रसंगी इतका छान विनोद करीत की भक्तांना हसू आवरत नसे. सहसा ज्याची थट्टा केली जाते त्याला ती आवडत नसते; परंतु बाबांची थट्टा प्रेमाची व काहीतरी शिकविण्यासाठी असल्याने लोकांना ती आवडत असे.

या अध्यायात हेमाडपंतांची फुटाण्यावरून थट्टा करून **'एकेकटे खाणे बरे नव्हे'** हे सांगून बाबांनी त्यांनाच नव्हे तर जमलेल्या सर्व भक्तांनासुद्धा केवढे महान तत्त्व शिकविले!

**विषयीं जयासी हव्यास।**
**परमार्थ न धरी तयाची आस।**
**तयांवरी जो घालील कास।**
**तयाचा दास परमार्थ॥४३॥**

**''यदा पंचावतिष्ठते''।**
**या मंत्रें जें श्रुति वदते।**
**तेच बाबा या थट्टेच्या निमित्तें।**
**दृढ करितें जाहलें॥४४॥**

तसेच अण्णा चिंचणीकर व मावशीबाई यांचा तंटा बाबांनी **''अनुचित काय तेंच समजेना। मुका घेताना आईचा॥''** असे थट्टेने बोलून सगळ्यांनाच हसवून कसा मिटविला!

**नवल बाबांची सहज युक्ति।**
**बोल बोलती समयोचिती।**
**जेणें श्रोते अंतरी निवती।**
**बोधही घेती तात्काळ॥१२४॥**

सारांश, बाबांचा विनोद श्रोत्यांना नुसता रंजविण्याचा नव्हता तर त्यातून सगळ्यांना हितकारक असे सारच शिकविण्यासाठी होता. म्हणून बाबांचे अनुभवी भक्त त्यांच्या बोलण्याला नुसती थट्टा म्हणून सोडून देत नसत, तर त्यांच्या मनाची खात्री असे की:

**असो वा नसो विनोदवाणी।**
**कदा न ती होणे निष्कारणी।**
**बाबांच्या एकेक अक्षरगणीं।**
**असती खाणी अर्थाच्या॥६०॥**

–अध्याय २०


# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## विश्वस्त मंडळ

प्रा. डॉ. लेखा पाठक (अध्यक्षा)
श्री. हेमराज शहा
श्री. मनोहर ना. गोगटे
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. पृथ्वीराज रा. आदिक
श्री. शिवराम रा. शिंदे
श्री. राजीव प्र. कुलकर्णी
डॉ. एकनाथ भा. गोंदकर
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. भिमाशंकर व्यं. खांबेकर
श्री. बाबुराव अ. नरोडे (पाटील)
श्री. दादासाहेब श. रोहमारे (पाटील)
श्री. प्रभाकर भि. बोरावके
श्री. उत्तमराव रं. शेळके
श्री. सोपानराव मा. धोर्डे
श्री. कारभारी भि. देवकर
श्री. अनंतकुमार कि. पाटील
श्री. मोतीराम सि. पवार
श्री. प्रशांत व्यं. हिरे
प्रा. नारायण स. फरान्दे (आमदार)
श्री. अण्णासाहेब म्हस्के (आमदार)
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. गोपीनाथ ब. कोते (पाटील)
श्री. श्रीपतराव मा. जाधव
श्री. मोहन मो. जयकर
श्री. विष्णुपद श्री. बुटे
(कार्यकारी अधिकारी)

# सर्व साईभक्तांना आवाहन !

प्रिय साईभक्तांनो !

सप्रेम नमस्कार.

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी अनेकांनी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा.

या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावरही कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे. चेक कृपया 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावावर असावा.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकित,<br>
**– अरुण ताम्हणकर**<br>
कार्यकारी संपादक<br>
**'श्री साईलीला'**

------------------✂------------------ इथे कापा ------------------✂------------------

कार्यकारी संपादक<br>
**'श्री साईलीला'**,<br>
८०४-बी, साईनिकेतन,<br>
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),<br>
मुंबई – ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण रु. २५० (एकूण दोनशेपन्नास रुपये मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ____________________

पत्ता : ____________________

____________________

____________________


(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

मार्च – एप्रिल १९९३

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालि





SAI BABA BHAKTA NIWAS

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७२-७३ अंक १२-१

मार्च–एप्रिल ९३

संपादक
प्रा. डॉ. लेखा पाठक

कार्यकारी संपादक
अरूण ताम्हणकर

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई–४०० ०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी– रु. ५०/-,
आजीव सभासद वर्गणी– रु. १,०००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी– रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक– रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक प्रा. डॉ. लेखा पाठक, अध्यक्षा, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांविषयीची कोणतीही कायदेशीर कारवाई मुंबईच्या न्यायकक्षेतच होऊ शकते, याची कृपया नोंद घ्यावी.

# अकरा हनुमान

(मागील अंकावरून)

श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या वादात सामान्य माणूस गोंधळून जातो. त्याला बुद्धिभ्रम झाल्याचा अनुभव येऊ लागतो.

आपली दैवते, त्यांची रूपे, त्यांचे कार्य आणि त्यांच्या जन्मकथा विचारी माणसाला संभ्रमात टाकणाऱ्या आहेत.

वायुसूत हनुमान अथवा मारूती हे असेच एक दैवत आहे की त्याच्याविषयी अधिक विचार करू लागताच अनेक प्रश्न उभे राहतात.

हनुमान हा वानरयोनी आहे. तरीही तो बुद्धिमताम् वरिष्ठम्, मनोजवम्, मारूततुल्य वेगम् आणि जितेन्द्रीयम्ही आहे. ज्या देशात वानर एवढा महान असू शकतो त्या देशात आज माणसंसुद्धा वानरापेक्षा चंचल आणि भोळसट कशी जन्मू शकतात?

असं नसेल तर आपण समजतोय तो 'वानरयुत मुख्यम्' हनुमान वेगळा असला पाहिजे. वाढता वाढता शून्यमंडळालाही भेदणारा हा हनुमान समजून घेण्यात आपण कुठेतरी चुकलो आहोत. जड पातळीवरील हनुमान व सुक्ष्मातील हनुमान यांच्यातील सांधा शास्त्रार्थीच्या अभावी तुटल्यामुळे दैवते समजून घेताना वैचारिक प्रदुषण निर्माण झाले आहे. या प्रदुषणातूनच श्रद्धा–अंधश्रद्धा–भक्ति असे भावूक शब्द जन्माला येऊन अवधान सुटले आहे. हे अवधान परत आणायचे असेल तर या वैचारिक प्रदुषणापासून दूर जाऊन समजाऊन घेण्याचा समजुतदारपणा वाढविला पाहिजे.

असाच समजुतदारपणा वाढवित असताना पंडित ग. रा. सावंतांना हनुमान कसा जाणवला ते पहा....

–कार्यकारी संपादक

## विराट मारूती

धरणीगर्भसंभूतं विद्युत्कान्तिसमप्रभम्।
कुमारं शक्तिहस्तं च
मङ्गलंप्रणमाम्यहम्॥३॥

हे हनुमंता! तुझ्या पार्थिव अर्चावताराच्या लहानशा देवळांतून बाहेर पडून या विस्तीर्ण आकाशघुमटाखालील बृहद्देवालयांत येऊन पहावे. तो तुझे दुसरे त्वयम्भू भौम प्रतिक नजरेपुढे येते. तुझ्या सहस्त्रनामांत तुला कुमार, मंगल व कुज असेहि म्हटले आहे. भूतकोटींत पार्थिवयोनी ही जशी निकृष्ट आहे तशी जीवकोटींत पशुयोनीहि निकृष्ट मानली आहे, म्हणून तुम्ही उभयतां कुज म्हटले जातां, परंतु तेज हेच तुमचे तत्त्वत: रूप आहे. अंगाराप्रमाणे लाल असा तुमचा वर्ण आहे. तुला सिंदूरवदन व लोहितांग असे म्हणतात.

हे महारूद्रा! तू जसा रौद्र आहेस, तसाच मंगळ हाहि रूद्राचाच अंश आहे. रूद्राच्या घर्मबिंदूपासून मंगळ झाला. तो पहिले मरूद्गण जे गणेश त्यांच्या कृपेने चिरंजिव झाला. तुझ्या घर्मबिंदूपासून मकरध्वज झाला. मकरध्वज हा मंगळच होय. मकर हेच मंगळाचे उच्च राशिस्थान आहे.

हे रामसख्या! सीतारूप प्रकृतीचा रामभेटीसंबंधीं जो उत्कट काम, त्या कामालाच क्रोधाचें स्वरूप प्राप्त झालें. तेच तुझे रूप होय. त्या तुझ्या क्रोधाग्नीनें लंकेची राख झाली. त्या वेळचा कृतकार्याचा तुझ्या निढळावरील जो घाम समुद्रात पडला, तो एका मगरीचे पोटात जाऊन त्यापासून मकरध्वज जन्मास आला. मंगळाचे जन्माचा अशाच स्वरूपाचा लाक्षणिक इतिहास आहे.

हे महारूद्रा! रूद्रपुत्र कार्तिकेय आणि

तू या तुम्हां दोघांत ऐक्य कसें आहे. हे पूर्वीच निवेदन झालें आहे. तो कार्तिकेय आणि मंगल हेहि तत्त्वत: एकच असें शास्त्रज्ञ मानतात.

तसेंच हे हनुमंता! शिवलिंगाचे ठिकाणी जीवनोत्पत्ति व रूद्रशक्तीचे ठिकाणीं नाश, अशा ज्याप्रमाणें शिव व घोर अशा भावना संभवतात, त्याचप्रमाणें मंगळाचे ठिकाणीं व तुझ्या ठिकाणीं उभयविध भावना शोभतात. मेणाहून मरू असा तू विष्णुदास आहेस, तसा वज्राहूनहि कठोर असा तू रक्षोघ्न आहेस. यास्तव जन्म-लग्नकुंडलींत मंगळ प्रतिकूल असून चालत नाही. तुझ्या अनुकूलतेमुळें सीता-रामांच्या विवाहाची सार्थकता झाली! याच न्यायानें तू प्रतिकूल होण्यांत आमचा निश्चित अध:पात आहे!!

हे सिंदूरवदना लोहितांगा! मंगळ आणि तू दोघेहि देवांचे सेनानी आहांत वारांचे अंगात सळसळणारे रक्त हें तुमचे अंत:स्वरूप असून धर्म हे बाह्यस्वरूप आहे.

तुम्ही रौद्र आणि कुज असण्यांत ज्याप्रमाणें तुमचें ऐक्य आहे, त्याप्रमाणें कालमहात्मानेंहि तुम्ही एकच आहांत. वसंताचा मध्य, मार्च अखेर, मेष रास व मंगळवार असें तुमचें दोघांचेहि कालमाहात्म्य तंतोतंत एकच आहे. याप्रमाणे नाम, रूप, तत्त्व दिक्काल व कार्यकारणभाव, तसाच अग्नीप्रमाणें तेजस्वी स्वभाव व शूर सेनानी हा व्यवसाय. अशा अनेक दृष्टींनीं मंगळही तुझीच विभूति आहे, यात शंका रहात नाहीं: यास्तव, अभ्युद्येच्छूंनीं आपल्या पराक्रमस्थानीं तुज मंगळाची उपासना करावी, हे योग्य दिसतें.

सूर्यवंशी रामाचा अथवा सूर्यरूप रामाचा मंगल तू आहेस. सूर्यरूप रामाचे भक्त जटायू व संपति हे अंतरिक्षांतून उडून सूर्याजवळ जाऊ पाहणारे बुध आणि शुक्र ग्रह होत, असे म्हणतात त्याचप्रमाणें सूर्यरूप रामाचे पायांशी धांवत जाणाऱ्या तुला मी मंगलच मानल्यास ते योग्यच होईल.

**''मारूतीराया बलभीमा।**
**दे मज रामभजनप्रेमा॥''**

असे तुझे भजन करणारे भक्त, मकरध्वज म्हणजे प्रेमध्वज मंगलाचें मंगल म्हणत असतात तुझ्या सहस्त्रनामाचे शेवटचें तुझे नांव सुमंगल असेंच आहे. तू तेजस्वी व पराक्रमी असूनहि निरंहकारत्त्वानें लहानाहूनहि लहान झाला आहेस. तसाच मंगल तेजस्वी व पराक्रमी असून लहान आहे.

हे हनुमंता! तुझा आणि माझा संबंध ज्या द्रव्य शक्तिद्वारा असेल त्यांचीं शास्त्रोक्त दिव्य प्रतिकें मी शोधीत आहें. हे कपिश्रेष्ठा! तू देवाचा वानर अथवा वानराचा देव झाला असल्यास, तर या तुझ्या अवतरणांच्या किंवा उद्धरणांच्या मार्गातील जे जे लोक, प्रांत, किंवा टप्पे असतील ते मला तीर्थक्षेत्राप्रमाणेंच पुण्यकारक वाटत असल्यामुळें, व प्रत्येक जीवाप्रमाणें माझाहि तोच मार्ग असल्यामुळें, मी त्या त्या तीर्थक्षेत्राची मनोमय यात्रा करीत आहें.

हे पुराणपुरूषा! जीवकोटीच्या सुदीर्घ जीवनांतील रूपांतरांत ज्या अनेक मन्वंतरांतून व लोकांतरांतून प्रवास करावा लागतो, ती दिक्कालगतींची प्रवासवर्णनें वाचीत असतां, मंगळादि लोकांवर प्रचंडरूप धारण करणाऱ्या अशा वानरांच्या कोटीहि आढळतात. आणि मग नरांपासून वानर झाले. अथवा वानरांपासून नर झाले, किंवा नर-वानर एकच, अशीं ही अनेक विधानें निमूल ठरून नर आणि वानर या स्वतंत्र कोटि आहेत, हे कळून येतें. मग, तुझी नवलकथा पृथ्वीवरील प्रङ्मेरू, सुमेरी किंवा किलिमांजारीच काय, तर चंद्र-मंगळांवरील गिरिगुहरांतीलहि अंशत: असेल, नाही कोणीं म्हणावे! असे मनांत येतें.

हे हनुमंता! या ब्रह्मांड-कल्पनेवरून पिण्डांतर्गत विचार करावयाचा तर पिण्डांतील रजोगुणी रक्त हाच पिण्डांचा आधार आहे. पिण्डाचें गुणधर्म त्याच्या रक्तांत भिनलेले असतात. पिण्डांत सळसळणारें रक्त हेंच क्रियात्मक आहे. तेंच प्रभावी आहे. तेंच शक्तिस्वरूप आहे. तेंच बलाचें द्योतक आहे. असें जे पिण्डव्यापक व पिण्डाधार रजोगुणी रक्त तेंच मंगलतत्त्व होय. त्या रक्तरूप मंगलतत्त्वाचे ठिकाणीं मी तुझी धारणा करतो ती अशी की, हे आर्य संस्कृतीच्या आदर्शरूप मारूती देवा! तुझ्याच संस्कृतीचें रक्त माझ्या अंगात खेळत आहे. तरी तुझ्या कृपेच्या रूपांत तूच माझ्या अंगात संचार कर, व माझी सत्त्वसंशुद्धि करून स्वरूप– साक्षात्कारास मला समर्थ कर.

## शनी मारूती

**नीलाञ्जनसमाभासं रविपुत्रं यमाग्रजम्।**
**छायामार्तण्डसंभूतं त्वं**
**नमामि शनैश्वरम्॥७॥**
**रविश्चन्द्र: कुज: सौम्यो**
**गुरु: काव्य: शनैश्वर:।**
**राहू:केतूर्मरुद्धोता धाता**
**हर्ता समीरज:॥५१॥**

हे हनुमंता! ह्याप्रमाणे तुझ्या स्तोत्रांत तुझी नवग्रहांचे ठिकाणी धारणा सांगितली आहे. हे महारूद्रा! रूद्रप्राणांचे उपद्रावक स्वरूप जास्त लक्षांत येतें. शरीराच्या स्वस्थ रूपातव देहभान स्पष्ट व अखंड होत राहातें! इतिहासांत स्वास्थाचे दिवस वगळून, युद्धाचेच दिवस वर्णिले जातात. रामायण आणि महाभारत या युद्धकथाच आहेत. तुझ्या मंदिरांत तुझें उग्र स्वरूपच चित्रित केलेलें असतें. तुझ्या उपासनांत तुझ्या संहारक रौद्ररूपाचेंच ध्यान सांगितले आहे व नवग्रहांत प्रामुख्यानें शनीचें स्वरूप तुझ्याप्रमाणें उग्र आहे.

हे हनुमंता! सारी सूर्यमाला ही तुझीच विभूति आहे. त्यांतहि तुझी माता अंजनी आणि शनीची माता छाया या एकरूपच दिसतात. उष्ण वायूपासून जसा तुझा जन्म, तसाच शनीचाहि जन्म झाला आहे. दोघांचेहि वात हेंच तत्त्व आहे व दोघांचेहि ठिकाणीं रूद्रांशहि आहेत! तुझा आणि शनीचा जन्मवार एकच आहे. तू जन्मतांच सूर्यावर झेंप घातलीस, तसेंच शनीनें सूर्याशीं जन्मापासून हाडवैरच बाळगलें.

हे मारूते! शनी तुझ्याप्रमाणेंच स्वत: ऋजुस्वभावाचा असून वैभव प्राप्त करून देणारा आहे. पण ज्याचेशीं त्याचे वैर येईल, त्याला तो तुझ्याप्रमाणेंच रडविणारा असून त्याचा संहार करणारा आहे. उभयतांचे चंचल व छळक स्वभाव समान आहेत.

हे वायुनंदना! शनी ही तुजप्रमाणेंच वैराग्यमूर्ती आहे. त्याचा बुधाशक्षं संयोग वैष्णव उपासना दाखविणारा आहे. तुझें चरित्रहि तेंच सांगते. दशरथाचा शनी पुरस्कर्ता होता, तसाच तू दाशरथीचा पुरस्कर्ता प्रसिद्ध आहेस. उपासनेचे दृष्टीनें

शनी हा वैष्णव शक्तिचें कार्य करीत असलेला रूद्रांश आहे असें मानतात. तूंही तसाच आहेस.

हे मारूते! तुझ्या सहस्त्रनामांत तुला शनैश्वर असें म्हटलें आहे. तुझें उपासक शनीवारच पाळतात व शनीचेच पूजोपचार तुला समर्पित करतात. आधुनिक विद्वान शनीला शेतीचा देव मानतात. रामकार्यासहि ते शेतीच मानतात व तुला वर्षाकाळच्या वादळाचा देव मानतात. शनीचें वलय हें तुझ्या पुच्छाप्रमाणेंच दिसतें. तसेंच इतर ग्रहांपेक्षा आकाशांतील शनीची उडीही तुझ्याप्रमाणेंच फार मोठी आहे. शनीचें एक वर्ष पृथ्वीच्या वर्षापेक्षां तीस पट मोठे आहे. या शनीच्या दीर्घ जीवनांतहि तुझ्याशीं साम्य आहे.

अशा अनेक कारणास्तव शनी हा एक तुझाच विग्रह मी समजतो व त्याचे ठिकाणी तुझी धारणा करतों.

या सूर्यमालेंत तसेंच जन्म-लग्नकुंडलीत शनीचें महत्त्व फार आहे. तसेंच व्यष्टि=समष्टीच्या रामभक्तिच्या योगांत तुझे असाधारण महत्त्व आहे. तुझी सहानुभूती असेल तरच रामकृपेची आशा आहे. ती नसेल तर, रामकृपा न होताच राम म्हणावें लागेल! तसेच कोणी शास्त्रज्ञ असेंहि म्हणतात की त्रेतायुगांतील लेमुरिया नामक जी तुझी कार्यभूमि, ते शनीचेंच राज्य होय व असाहि संभव आहे की, शनीनेंच आम्हा जड बुद्धीच्या मानव जीवांना तुझ्यासारखा अप्राकृत वानर मार्गदर्शक म्हणून दिला असावा. राम-रावण युद्धापूर्वीच तू रावणाची खोड जिरवलीस. शनीनें तेच कार्य केले. त्या अतिप्राचीन काळाचा तूंच एक ज्ञाता आहेस. आम्हीं आज तुझ्या त्या कालाबद्दल काय कल्पना करावी.

पण हे चिरंजिव पुरूषा! तुला भूत, भविष्य, वर्तमान तिन्ही काल सारखेच आहेत. सूर्यमालेच्या उत्पत्तीपासून, सूर्यमालेंतील सर्व खगोलांचा– आंतरराष्ट्रीय संबंधाप्रमाणें किंबहुना त्याहूनहि घनिष्ट असा संबंध असलाच पाहिजे. स्वस्थ गोल हे भिन्न भिन्न स्फूर्तिदायक व परिणामकारक असे शक्तिकेन्द्र आहेत. शक्तिकेन्द्रांत शेवटला अहर्गण जसा तू, तसाच पूर्वीपासून प्रसिद्ध असलेल्या ग्रहांत शेवटला शनी तो तू, अशी मी तुमच्या कित्येक समानधर्मांवरून भावना करितों.

हे हनुमंता! पुरूष प्रकृतीचें लग्न, पुढें खडतर प्रपंचाला वनवास, नंतर वियोग, असें हे प्रत्येक जीवाचें रामायण सुरूच आहे. या रामायणांतील प्रभावी असा कार्यकर्ता तू शनी-मारूतीच आहेस. शक्ति आणि युक्ति, वैराग्य आणि मोक्ष यांचाहि दाता तू शनी-मारूतीच आहेस.

कबीर साहेब थट्टेनें म्हणतात कीं, प्रभु रामचंद्राची लीला काय सांगावी!

''विभाषणको लंका दई। हनुमान को तेल ?'' हा तेली राजा म्हणजे विक्रमाला तेली बनविणारा शनीच होय.

हे चिरंजिव पुरूषा! रूद्र आणि शनी ही कालस्वरूपें आहेत. कालहंस शनीचें वाहन आहे. सृष्टींतील मूळच्या प्राण्यांच्या जातीला हंस अशी संज्ञा भागवतात दिली आहे. हंसाकरितां वाट करणें, या पराक्रमास क्रौंचदारण असें म्हणतात. क्रौंचदारण हा एक गूढ संकेत दिसतों, हे मागे सांगितलेंच. तसेंच हंस हे सारासार विवेकाचें चिन्ह दिसते. क्रौंचदारण हा एक प्राणांचा योग आहे, व हंस हें विज्ञान होय. शनी ही अध्यात्मांत त्यागाचा उत्कर्ष दाखविणारी देवता आहे. शनीला देवाधिदेव –महादेव– असें कांहीं धर्मांत मानतात. शनीची आकृति शिवलिंगाप्रमाणेंच आहे. त्याच्या आठ चंद्रामुळें तो अष्टमूर्ति आहे. तो अग्नीहून उष्ण व वायूहून तरल आहे.

हे मारूते! पिंडदृष्टीनें विचार केला तर शनी आणि तू या दोघांचे जें वानतत्त्व, तेंच शरीरांत कारक आणि पातक मानलें आहे. अशा अनेक मुद्यांचा जों जों विचार करावा, तों तों अचिंत्य अशा ईशशक्तिचें गोतावळें तुझ्या पुच्छाप्रमाणें वाढत जातें व मन आश्चर्यचकित होऊन क्षणमात्र अंतर्मुख होतें.

## धूमकेतू हनुमान्
### (शेंडे नक्षत्र)

**धूमकेतुर्महाकेतुः सत्त्वकेतुर्महारथः।**
**(नन्दिप्रियः स्वतन्त्रश्च**
**मेखली डमरूप्रियः॥१३०॥)**
**बहुयोजनविस्तीर्णपुच्छः**
**पुच्छहतासूरः॥९५॥**
**मेघनादो मेघरूपो**
**मेघवृष्टिनिवारकः॥९८॥**
**स्वर्णवर्णो बलादक्ष पुरूजेताऽघनाशनः**
**कैवल्यदीपः कैवल्यो**
**गरूडःपन्नगो गुरूः॥१०७॥**
**(उलूखलमुखः सिद्धसंस्तुत**
**प्रथमेश्वर॥१२०॥**
**हस्ताभ्यां धृतपुस्तकं:च**
**विलसध्दारावलिं कुण्डलं॥**
**यश्चालंबिशिखं प्रसन्नवदनं**
**श्रीवायुपुत्रं भजेत्॥४३॥**

हे हनुमंता! ज्या वेळीं सूर्य, चंद्र, पृथ्वी हे कांहींच नव्हतें. त्यावेळीं अंजना नामक एक तम मात्र तप करीत होतें. म्हणजे विचार करीत होतें. कीं, मी बहू व्हावें. या इच्छेंतच ज्ञान आणि क्रिया, अग्नि आणि वायु हें द्वंद्व निर्माण झालें. त्यावेळीं वायुनें तमाचें आवरण म्हणजे अंजनेचें वस्त्र विचलित केलें तेव्हां अग्नीचें अथवा अग्निरूप रूद्राचें रेत म्हणजे जल ह्याचे वायूशीं संघर्षण झालें व त्या संघर्षांत अंजनेच्या पोटीं, म्हणजे तमाचे पोटीं अशनीसंघात, म्हणजे तेजोमेघ अथवा धूमकेतुरूप अग्नि उत्पन्न झाला व तो विस्तीर्ण पुच्छाचा, अथवा जणू लांब शेंडी असलेला, अनेक पायांचा व अनेक हातांचा, वाल्मिकीप्रमाणे भावी सृष्ट्युत्पत्तिकथनाचें पुस्तक हातीं घेऊन वृषभाप्रमाणें मेघनाद करीत, गरूडाप्रमाणें आकाशांतून– ब्रह्मवनांतून स्वतंत्र्य मार्गानें, जणूं आकाशमार्गीची मार्गदर्शक प्रचंड चूडच की काय, असा जो परमेश्वर निर्माण झाला तो तू असें याबद्दल उघड दिसतें.

तू जन्मातांच जगावर मोठेंच अरिष्ट आल्याप्रमाणें वर्णन केलें आहे. ते तुज धूमकेतुकडे पाहून आकाशरूप अनिरूक्त देवता भयभीत झाल्या, त्याचेंच वर्णन असलेल्या पहिल्याच युद्धांत तू देवतांकडून जी लूट मिळवलीस, ते परोक्ष वर्णन दिसतें. सूर्यानें आपल्या प्रकाशाचा अंश तुला दिला नसून तुझ्या अग्निराशींतूनच सूर्य निर्माण झाला व त्यापैकींच जो स्निग्ध भाग खालीं आला तीच पृथ्वी, म्हणजे तेंच तुझे पुराणोक्त पार्थिव हनुमंताचें रूप होय.

**यदयुक्था अरूषा रोहितारथे वातजूता वृषभस्येव ते रथः आदिन्वसि वनिनो धूमकेतुनाग्रेसख्ये मारिषामावयं**

तव॥१/९४/१९ ऋग्वेद॥ पुरा स्तिमितमाकाशमनन्तमचलोपमम्। नष्ट चन्द्राकंपवनं प्रसुप्तमिवं संभमौ॥१॥ तत: सलिलमुत्पन्नं तपसीवापरं नम:। तस्माद्य सलिलोत्पीडादुदतिष्टत मारूत:॥२॥ यथा भाजनमच्छिन्द्रं नि:शब्दामव लक्ष्यते॥ तद्याम्भसा पूर्यमाणं सशब्दं कुरुते:निल:॥३॥ तथा सलिल संरूद्रे नम सोऽन्ते निरन्तरे। भित्त्वार्णतल वायु: समुत्पतति घोषवान्॥४॥ स एष चरते वायुरर्णवोत्पीडसम्भव:॥ आकाशस्थानप्रसादप्रशान्तिं नाधि गच्छति॥५॥ तस्मिन् वाखम्बुसंघर्षे दीप्ततेजा महाबल:॥ प्रादुरभूदूर्ध्वशिख: कृत्वानिस्तिमिरनभ:॥६॥ अग्नि: पवनसंयुक्त: खं समाक्षिपते जलम्॥ सोऽग्निर्मारूतसंयोगाद् घनत्त्वसुप्रद्यते॥७॥ तस्याकाशं निपतित: स्नेहास्तिष्टति थोऽपर:। स संघातत्वमापन्नो भूमित्वमनुगच्छति॥८॥ रसानां सर्वगन्धानां स्नेहांना प्राणिता तथा॥ भूमिर्योनिरिह ज्ञेया यस्यां सर्व प्रसूयते॥९॥ महाभारत मोक्षधर्म, अ. १८३/९-१७

(१) भान्विन्तूचरणान्विदयुगलं कैपीनमौञ्जीधर। काञ्ची श्रेणिधरंदुकूलवसनं यज्ञोपवीताजिनम्। हस्ताभ्यां धृतपुस्तकं च विलसध्दारावलिं कुण्डलं। यश्चालंबिशिखं प्रसन्नवदनं श्रीवायुपुत्रं भजेत्॥४३॥

तसेच विधात्यानें तुला चंद्र दिला नसून सूर्य-पृथ्वी, चंद्र इत्यादि सर्व सूर्यमाला तुजपासूनच निर्माण झाल्या, असें हे सारें परोक्ष वर्णन दिसतें.

हे हनुमंता! तू जन्मतांच सूर्य गिळलास व ओकून टाकलास, अशी रामायणांत कथा आहे. त्या कथेंतहि तुज तेजामेघोचें परोक्षवर्णन आहे.

हे विराट् पुरुषा! ह्याप्रमाणें रवि, चंद्र, मंगळ, शनी व धूमकेतु यांचे ठिकाणी तुझ्या तात्विक स्वरूपाची धारणा करणें जर सयुक्तिक ठरत असेल, तर सर्वांस व्यापून उरणारा तू या सर्वांहून मोठा आहेस, असें उघडच सिद्ध होतें. यास्तव तुझ्या त्या विराट्स्वरूपाचा विचार केला तर प्राण्यांच्या अनंत पूर्वजन्मांचे प्राक्‌र्मसंस्कार सृष्टयुन्मुख तेजामेघोप्रमाणेंच मला भासूं लागतात. तेंच तुज पूर्वजांचे प्राथमिक स्वरूप असें मनांत येतें.

## क्षराक्षर किंवा विश्वचर

**क्षरोऽक्षरो विनीतात्मा वानरेश: सतांगति॥११२॥ ह. स. ना.**

हे बृहत्काय पुरूषा! तुला मी केवळ अवतारी पुरुष असें न म्हणतां तुझ्या ठिकाणीं मी क्षराक्षर पुरूषांची धारणा करीत आहें. कारण अवतारी पुरुषांस जन्ममरण असतें. तसेंच त्यांच्यामागें त्यांचा संसारहि लागतो. पण तुझा जन्म परशुराम-रामकृष्ण बुद्ध यांच्या जन्मापेक्षां अलौकिक आहे. आणि इतर अवतारी पुरुषाप्रमाणें तुझें निर्वाण शास्त्रांत सांगितलें नाहीं. शिवाय तुला तुझा वैयक्तिक असा संसार मुळींच नव्हता. आद्यक्रियात्मक व्यापक प्राणतत्त्व आणि जाणीवतत्त्व मिळून तुझें तत्त्वत: क्षराक्षर रूप सिद्ध होतें, अशी मी कल्पना करितो. श्री समर्थ म्हणतात– "उपासना शोधून पाहिली। तों ते विश्वपाळिती जाली। दा. बो. १५/९/२१

हे विराटपुरूषा! तुझ्या उपासनाग्रंथांत तुझ्या अनेक शक्तींचीं दर्शक अशीं तुला अनेक मुखें असल्याचें वर्णिलें आहे. तू रक्षात्मक एकमुखी आहेस व बलात्मक अनंतमुखी पण आहेस. तुझ्या अनेक सहस्त्रनामावल्या हें तुझ्या अनंत मुखाचेंच द्योतक आहे.

हे हनुमंता! परब्रह्मास रस हे एक पारिभाषिक नांव आहे या रसाची जी ईशिता अथवा शक्ति, तिलाच बल म्हणतात. तेंच तुझें स्वरूप होय असें मी म्हणतों. प्राण आणि क्रिया या त्या बलाच्याच व्यक्त अवस्था मानतात.

या मायाबलाच्या मध्यवर्ति मन असून त्याच्या प्राण आणि वाक् या बहि:श्वेतीरूप बंधक कला आहेत व विज्ञान आणि आनंद या अंत:श्वेतीरूप मुक्तिदायक कला आहेत.

हे विश्वचर पुरुषा! राक्षसांचा नाश करणें म्हणजे विचारदृष्ट्या त्यास प्राकृतिक ठरविणें आणि भक्तांस मुक्तीच्या वाटा दाखविणें म्हणजे त्यांचें पुरुषरूप त्यांस पटविणें, अशीच वृत्तिरूप तुझी हीं पांच मुखें आहेत. यासच आनंदमय, विज्ञानमय, मनोमय, प्राणमय व वाङ्मय (अन्नमय) कोश असें म्हणतात. किंवा आत्मा, बुद्धी, मन, ज्ञानेंदियें व कर्मेंद्रियें असें म्हणतात.

हे अक्षर पुरूषा! ज्ञान हे तुझें शुद्ध स्वरूप असून कर्म हे सबलरूप आहे. कमलनालावर स्थित असलेल्या ब्रह्मदेवाप्रमाणे तू चतुर्मुख आपल्या पुच्छावर प्रतिष्ठित आहेस. तू वानरूप राक्षसांच्या बलाचें बलिदान घेतलेंस, त्यावरून शास्त्रीय परिभाषेप्रमाणें ते अन्न व तू अन्नादभावास प्राप्त झालास. तू बलिष्ठांच्या बलाचा बळी घेतलास, हे तू विष्णूचेंच यज्ञकर्म केलेंस, आणि उलट तू आपल्या बलाचा राम व रामभक्त यांच्या कार्यात उत्सर्ग करून तू आपले शिवरूप व्यक्त केलेंस, याप्रमाणें ब्रह्मा, विष्णु, महेश (इंद्र), अग्नि आणि सोम अशीं तुझी कर्मात्मक पांच रूपें विराजमान झालीं. यापैकीं ब्रह्मा-विष्णु-महेश हे तुझें हृदय असून अग्नि-सोमात्मक बाह्य शरीर झालें. तू हराचा अंश असून नांवाचा हरि आहेस, आणि धात्वर्थानें हर आणि हरि हे एकरूपच आहेत. हें जें आदानविसर्गाचें स्थितिरूप, तोच विधिरूप तू आहेस. ब्रह्मदेवाचा संबंध मन, ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांच्याशी आहे. तीच तुझी पशुयोनि आहे.

हे क्षराक्षर पुरूषा! तुझ्या क्षररूपाच्याहि प्राण आप, वाक्, अन्न आणि अन्नाद अशा पंचकला शास्त्रांनी मानल्या असून पंचीकृत पंचभूतांप्रमाणें त्यांचीं पंचीकरणप्रक्रियेने (१) प्राणप्रधान स्वयंभू, (२) आपप्रधान परमेष्ठी, (३) वाक्‌प्रधान सूर्य, (४) अन्नप्रधान चंद्र व (५) अन्नादप्रधान पृथ्वी. याप्रमाणें पांच महामंडळे एकात एक मानली आहेत.

हे हनुमंता! तू स्वयंभू प्राणप्रधान असल्यामुळें तू पृथ्वीवर अवतार घेतल्यावर स्वाभाविक प्रवृत्तीनें परत स्वयंभू मंडळाकडे येत असतांच सूर्यमंडळाचा भेद केलास, पण पुढे न जातां या पृथ्वीवरील देवकार्य करण्याकरितां देवांच्या रदबदलीनें पुन्हां येथे परतलास, हे आम्हा मर्त्यजनांवर तुझें केवढे उपकार बरें!

हे सप्तश्चैर देवा! या महामंडळापैकीं सूर्य आणि पृथ्वी यांचे दरम्यान जें अंतरिक्ष आहे. त्यासच चंद्रमा मंडल हें नांव प्राप्त झालें आहे. पण त्यावरील स्वयंभू, परमेष्टी व सूर्य या तीन महामंडलामधील दोन मधलीं अंतरिक्षे गणनेंत घेऊन भू: भुव: स्व: मह:

जनः तपः सत्यम् याप्रमाणें महामंडलें व अंतरिक्ष लोक मिळून सप्तलोक हींच तुझीं सप्तदर्शनें होत. म्हणूनच तुला सप्तस्वर्लोकमुकुट असें सहस्त्रनामस्तोत्रांत वर्णिलें आहे व सत्यादि सप्तलोकात्मक सात नांवें तुला दिलीं आहेत.

हे हनुमंता! या सृष्टिरचनेंत सप्तविधता हा एक विशेष आहे. साती साती एकुणपन्नास ही अहर्गणांची आणि मरूद्रणांची संख्या आहे. यापैकीं एकुणपन्नासावा शिरोभूषण तो तू असें म्हणतात. मला तर असें वाटतें कीं, शनीचें वलय हे तुझें पादपद्म असून मार्तंड हेंच तुझें सुख आहे.

हे अवतारी पुरूषा! क्षर पुरूषाचे आधिदैवत भेदाप्रमाणें आध्यात्मिकहि पांच कलाभेद शास्त्र मानतें. ते (१) अव्यय (केन्द्र), (२) महान् (आकृति, प्रकृति, आणि अहंकार, (३) विज्ञान (बुद्धि), (४) प्रज्ञान (मनासहितइंद्रियें) व (५) शरीर, यापैकीं शरीर ही बाह्यचिती असल्यामुळें त्यास शास्त्रीय परिभाषेंत पशु गणलें असावें. म्हणून तुझें विराटरूप मी कपीचेंच मानतो.

हे अलौकिक मायावी पुरूषा! त्या तपोनिधी भरताने तुला सोळा कन्या अर्पण केल्या. त्या या क्षराक्षराच्या पंधरा कला व तुझी शुद्धरसात्मक सोळावी कला ह्याप्रमाणें त्या षोडशी कला असतील काय! किंवा तुला पृथ्वीचा पुत्र साम (चंद्र) समजून तुझ्या षोडशकलांचाच त्यानें अनुवाद केला! अथवा तुज शब्दब्रह्माला दिलेल्या त्या कला म्हणजे षोडश मातृकाच होत्या? किंवा तुज महापुरूषाचें स्वागत करण्याकरतां त्यानें सादर केलेले ते षोडशोपचार होते?

हे आप्तकाम ईश्वरा! धर्म, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्ययुक्त व्यवसायात्मक बुद्धि तुजकडून आम्हांस मिळावी, आणि आमची तद्विपरीत पंचक्लेशात्मक बुद्धि निवृत्त व्हावी, यासाठी या जगताचें ठिकाणीं नियामक असणारा जो तू विश्वचर पुरूष, त्याचें मी सूक्ष्म व व्यापक दृष्टीनें चिंतन करीत आहें.

## विभूति

हे हनुमंता! परब्रह्माचें निर्गुण स्वरूप जाणणें हे एका अर्थी तारतम्यानें सोपें आहे. पण त्याच्या सगुणरूपाचें पूर्णपणे आकलन होणें अशक्यप्राय आहे. हे मारूते! जो आहेपणानें, जाणिवेनें व आनंदरूपानें सर्वत्र मिरवतो, त्या परमेश्वराला निर्गुण निराकार कसें मानावें! परमेश्वराला निराकार मानणें म्हणजे समुद्राला निर्जल मानण्याप्रमाणेंच आहे. तसेंच, ज्याला आपल्या ऐश्वर्याची जाणीव आहे, तो परमेश्वर निर्गुण कसा मानावा! निर्गुणावांचून निराकार संभवत नाहीं. जाणीव हा मनाचा धर्म आहे. ज्या ईश्वराला जाणीव म्हणजे मन आहे, त्याला शरीरहि असलेंच पाहिजे. साकार ईश्वर सर्वज्ञ नसेल ही कल्पनाच चूक आहे. साकार सिद्धपुरूषहि सर्वज्ञ असतात. असा हा सगुण-साकारवाद्यांचा युक्तिवाद आहे.

हे मारूते! साऱ्याच समुद्राचा घोट घेऊ पाहणारे अगस्तीसारखें साहसी पुरूष विरळाच! मिठाच्या मासोळीनें समुद्रांत बुडून समरस होणें शक्य आहे, पण सारा समुद्र पिऊन टाकणें शक्य नाहीं. सुवर्ण अनेक नामरूपें आपल्या अंगावर खेळवील, पण सारीं नामरूपें गिळून नाहींशीं करणें व आपण निर्गुण निराकार बनणें सुवर्णास शक्य नाहीं. कोणता तरी आकार आणि तद्वाचक नाम त्यानें धारण केलेंच पाहिजे. निर्गुणाला परिमाणच नाहीं. उलट सगुण अनंत आणि अमर्याद आहे.

हे हनुमंता! असें जे सर्वशक्तिमान सगुण ब्रह्म, तें पूर्णपणें कोणीं कसें जाणावें! व कोणीं जाणलें असें म्हटल्यास तें खरें कसें मानावें! भागवतोत्तम अर्जुन भगवंतास म्हणतो कीं: एथ आपुलें वाढपण जैसें। आपणचि जाणिजे आकाशें। कां भी येतुली घनवट ऐसें। पृथ्वीचि जाणे॥१७६॥ तैसा आपुलिये सर्वशक्ति। तुज तूंचि जाणसी लक्ष्मीपती। येर वेदादिक मती। मिरवती वायां॥१७७॥

अशी ही परिच्छिन्न बुद्धीची स्वभावतःच अडचण असल्यामुळें ईश्वर जरी सर्वत्र व्यापक आहे, तरी तो त्या समग्र रूपांत अज्ञेय आहे. यास्तव त्याच्या कोणत्या विभूति विशेष पूजनीय आहेत, तें समजून घेणें सामान्य साधकास उपासनेच्या कार्यासाठी जरूर पडतें.

अर्जुनाची ही अडचण मान्य करतांना भगवान तर आणखी असें म्हणतात कीं, ''हे अर्जुना! मी कसा केवढा आहें, हें माझें मलाच खरें कळत नाहीं. यासाठीं माझ्या मुख्य मुख्य विभूति ज्या प्रसिद्ध आहेत, त्या ऐक.'' असें म्हणून त्या यज्ञस्वरूप नारायणानें आपल्या विभूति सांगितल्या व अखेर हें सांगितलें किं, जी जी वस्तू वैभव, लक्ष्मी किंवा प्रभाव यांनी युक्त आहे, ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून आली आहे, असेंच तू समज. याप्रमाणें मरूद्रणांपैकीं मरिची तो मी, असें भगवंतानें अर्जुनाला सांगितले. उद्धवाला तर, हनुमान तो मी, असेंहि सांगितलें. शिवानेंहि मरूद्रणांपैकीं मारूति तो मी, असेंच बहुधा सांगितलें असतें. परमात्म्याच्या कोणत्याहि एका विग्रहाचा लक्ष्यार्थ ब्रह्मरूप मानल्यास परमात्म्याचे बाकीचे विग्रह त्या प्रथमविग्रहाच्या विभूति म्हणून मानल्या जातात. याप्रमाणें शंकर ही विभूति भगवद्गीतेंत कृष्णाची, गणेशगीतेंत गणेशाची व देवीगीतेंत देवीची ठरते.

हे हनुमंता! तुझ्या सहस्त्रनामावलींत मच्छकच्छादि दशावतार, कपिल व्यासादि महर्षि, हरिहरादि प्रमुख देव, निरनिराळ्या प्रमुख शक्ति, सप्तलोक, सप्तपाताळ, सारे ग्रह, तारका, नक्षत्रें, राशी अशीं कितीतरी नांवे तुला दिलीं आहेत. म्हणजेच तीं तीं व्यक्त रूपें ह्या तुझ्या विभूति मानल्या आहेत.

हे प्रथमेश्वरा! तू संपूर्ण सगुणब्रह्म आहेस आणि म्हणून तुझा योग सर्वत्र असून मुख्य मुख्य देव, ऋषि लोक, ग्रह, तारे, ह्या साऱ्या तुझ्या विभूति आहेत. उलट प्रभू रामचंद्र हेंच सगुण ब्रह्म मानल्यास, तू त्या सगुण रामाची विभूति आहेस. अशा या व्यापक विभूति योगांत तुझ्या कपिरूपासंबंधी सारे विकल्प विलयास जातात.

हे हनुमंता! निसर्गाच्या असंख्य शक्तींच्या धाग्यादोऱ्यांनी हा विश्वपट ओतप्रोत विणलेला दिसत आहे. संघटना आणि विघटना, अथवा गति, आगति आणि स्थिति हें विश्वाचें अतिसंक्षिप्त वर्णन आहे. पण ज्या शक्तीनें ह्या अनंत विश्वाची उत्पत्ति आणि अंत होतो, त्या शक्तीचें अनुमान कोण करील? तसेंच हे अगणित प्रचंड खगोल अंतराळीं

कोट्यावधि वर्षें तीव्र वेगानें ज्या शक्तिबळानें निरालंब फिरत आहेत, त्या शक्तीची कल्पना तरी काय करावी!

पार्थिव पदार्थांची गति, जलौघाची गति, वायुगति, उष्णतेची गति, प्रकाशगति, आकाशांतील स्पंदाची गति, मनोगति, अशा कितीतरी गति सुसंगत आणि विसंगत, एका दिशेनें, भिन्न दिशेनें व कल्पनातीत वेगानें धांवत आहेत, त्यांचें कसें वर्णन करावें!

इंद्रियार्थांचे संस्कार, त्या संस्कारांतून उधृत होणाऱ्या वासना, त्या वासनाच्या प्रेरणांनी होणाऱ्या कर्मप्रवृत्ति त्या कर्मांचे फलभोग देणारी ईशनीयती, त्यांतून पुन्हां उत्पन्न होणारे क्रियमाण, हे सारे अदृष्य शक्तिप्रहार किती गुंतागुंतीचे व निगूढ आहेत!

पण हे हनुमंता! जी प्रचंड विद्युच्छक्ति पर्वत शिखरांना दुभंग करते, तीच आमच्या लहान मुलाच्या हातांतील बिजलीची बत्ती पेटविते, जी महाप्राणशक्ति सर्व विश्वाचा आधार आहे, तीच आमचे शरीरांतील अति सूक्ष्म जीवाणूचे पोटात शिरून त्यांचे रक्षण करीत आहे. जी शक्ति या सूर्यगोलाहून हजारों पट मोठे खगोल सहजलीलेनें गरगर भिंगरीसारखे, गोफणीसारखे तीव्रवेगानें फिरवीत आहे. तीच शक्ती अतिसूक्ष्मत्त्वामुळें अदृश्य अशा विद्युत्कणांना सभोंवार फिरवीत आहे. तात्पर्य, आमच्या सूर्यमालेचें हुबेहूब प्रतिक जर अतिसूक्ष्म अशा परमाणूंतहि मिळतें, तर या व्यापक व प्रचंड शक्तीचें तुला एक पुराणोक्त मूर्तस्वरूप मानणें सयुक्तिकच ठरतें. पृथ्वीवरील कोणताही खडा पार्थिवच असतो. समुद्रांतील कोणतीही लहरी जलरूपच असते. त्याप्रमाणें या अमर्याद शक्तिसागरांतील एक लाट म्हणजे तू असाच विचार मनांत येतो. कारण परमात्मा जसा शक्तिमान आहे, तसाच तूंही त्याचा विग्रह शक्तिमान आहेस. सर्ववश्यकर: शक्तिरनन्तोऽनन्तमङ्गल:। असे तुझें अन्वर्थक स्तोत्र आहे.

## आधि दैवत

**लक्ष्मणप्राणदाता च सीताजीवनहेतुक:।**
**रामध्येयो हृषीकेशो**
**विष्णुभक्तो जटी बली॥४॥**
**देवारिदर्पहा होता धर्ता कर्ता जगत्प्रभु:।**
**नगरग्रामपालश्च शुद्धो**
**बुद्धो निरन्तर:॥४४॥**
**निरञ्जनो निर्विकल्पो**
**गुणातीतो भयङ्कर:।**
**हनुमन्तो दुराराध्यस्तप:साध्यो**
**महेश्वर:॥४५॥**

हे हनुमंता! राम-लक्ष्मण-सीता या ऐतिहासिक मानवदेहधारी व्यक्तीच खऱ्या. आतां त्यांस जरी अध्यात्मविशेष मानलें, तरी अध्यात्म व अधिभूत या दोघांचा आधार आधिदेवत हा आहे. आणि तेंच तुझें स्वरूप आहे, असें तुझ्या सहस्त्रनामस्तोत्रावरून व रामायणांतील इतिहासावरूनहि स्पष्ट दिसतें. आधिदवताच्या अनुकूलतेचें महत्त्व आज आम्हांस जाणवत नाहीं. हेंच एका काळीं वैभवाच्या शिखरावर असलेल्या आमच्या आजच्या अध:पाताचें कारण आहे. उलट पाश्चात्यांच्या भौतिक संशोधनांत परोक्षतेनें आधिदैवताचें चिंतन आणि शोधन होत आहे. हेंच त्यांच्या अभ्युदयाचें कारण असावें, असें दिसतें.

हे वायुदेवा! द्यौ: आणि पृथ्वी यांच्या मध्यवर्ती तुझें निवासस्थानरूप जसें अंतरिक्ष आहे, याचप्रमाणे अध्यात्म, आधिदैव, आधिभूत या अनुक्रमांत आधिदैवत हेंच तत्त्व मध्यस्थ दिसतें. आत्मचैतन्य, इंद्रिय-देवताचैतन्य व स्थूल इंद्रिय गोलक यांत इंद्रियदेवतेचें जें महत्त्व आहे, तेंच महत्त्व आत्माराम व आमची बहिर्मुख वृत्ति यांचे दरम्यान असलेला आधिदेवतारूप तुझें असलें पाहिजे. नेत्रेंद्रियदेवता जर अनुकूल नसेल, तर टकटकीत डोळ्यानेंहि आंत आत्मप्रकाश असूनहि कांहीं दिसत नाहीं. उलटपक्षीं देवताप्रसादानें जन्मांधहि प्रज्ञाचक्षू बनू शकतात. बाह्य जगांतहि सूर्यादि प्रकाशक देवता अनुकूल नसेल तर जवळचा पदार्थही दिसत नाहीं. नव्हें, आमचा देहही आम्हांस दिसत नाहीं. बुद्धिमंतानें मुख्य जें जाणावयाचें ते निर्गुण समरूप तुझ्या कृपेवांचून जाणतां येणारच नाहीं, ही गोष्ट मला जाणवल्यामुळें मी तुज आधिदैवतास जाणण्याचा प्रयत्न करीत आहे.

हे मारूते! कदलीवनांत तू भीमाला उपदेश करीत असतां त्यास बजावून सांगितलेंस कीं ''देवता हा बहुमान करण्यास योग्य असून मनुष्यांनीं तर विशेषत: त्यांचा सन्मान केला पाहिजे.'' खरोखर, मलाही असेंच वाटतें कीं, या भौतिकजगाशीं आधिदैवतजगाचा नियाम्यनियामक असा संबंध आहे. आणि देवता या आधिदैवत जगांतील अधिकारी आहेत.

हे हनुमंता! ''यदेवेह तदमुत्र यदमुत्रत तदन्विह'' असा शास्त्राचा सिद्धांत आहे. यास्तव माझ्या शरीराच्या ठिकाणीं जी आधिदैवत सत्तापरोक्ष भासत आहे. त्याच सत्तेचें विराट् स्वरूप या बाह्यजगतांत असलें पाहिजे. त्या विराट् प्राकृतिक स्वरूपाला अनुलक्षूनच शास्त्रांतील विधिविधानांत सगुणोपासनेचीं अनेक यंत्रें आणि तंत्रें यांची रचना केली आहे. हेतू असा कीं, त्या प्रतिकांवरून विराट् प्रकृति-यंत्रांची कल्पना करावी.

हे वायुनंदना! आकाश आणि वायु ही महद्भूतें उत्पन्न झाल्यावरही सारे विश्व अदृश्य व निराकारच होतें. वायुद्भव जें तेज, ते निर्माण झाल्यानंतरच हा सारा देवांचा व दृश्यांचा पसारा निर्माण झाला. तुला समर्थ वायुरूपच मानतात. तेव्हां आधिदैवताचा देव तूच होय. श्रीसमर्थ दासबोधांत म्हणतात:

**म्हणोनि वायोस्वरूपें देह धारिले।**
**ब्रह्मा विष्णु महेश जाले।**
**पुढें तेचि विस्तारलें।**
**पुत्रपौत्रि॥१०/४/२८॥**
**वायोमध्यें जाणीव गुण।**
**तेंचि ईश्वराचें लक्षण।**
**तयापासून त्रिगुण।**
**पुढें जाले॥१०/९/११॥**

हे वायुनंदना! त्रिगुणांच्या उत्पत्तीप्रमाणें या सर्व त्रिगुणात्मक निसर्गाचा लय वायूतच होतो. जेव्हां अग्नि विझतो तेव्हां तो वायूमध्येंच लीन होतो. चंद्र-सूर्याच्या प्रलयकालीं वायूंतच लय होतो. पाणी सुकते तेव्हां त्याचा वायूंतच लय होतो. दैनंदिन प्रलयानंतर म्हणजे गाढ झोप लागल्यानंतर सारं इंद्रियविज्ञान प्राणवायूंतच लय पावतें. तेव्हां वायु हाच देवांतील सर्वांचा संग्राहक संवर्ग आहे आणि हे हनुमंता, तेंच तुझें रूप आहे. अथवा हे सप्तमरूता! पिण्डांतील मुख्य सात धातू, सप्तशिर्षण्यप्राण, सात चक्रें, याच तुझ्या विभूति आहेत.

(पृष्ठ क्र. १७ वर)

# श्री साईंचे सत्य चरित्र

## —अध्याय २५ वा—

गद्य भाष्य टीका—
**ले. कर्नल मु. ब. निंबाळकर** (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

**'भक्त-अभीष्ट-संपादनं'**
(भक्ताला त्याचे मनोवांच्छित आणि कल्याण प्राप्त करून देणे)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्‌गुरु साईनाथांना नमस्कार असो.

कृपेचे सागर साईमहाराज साक्षात् ईश्वरी अवतार आहेत. ते पूर्णब्रह्म (परब्रह्म) असून महान योगेश्वर आहेत. त्यांना आमचा साष्टांग नमस्कार असो. हे संतललामा (संतांचे भूषण असलेल्या), मंगलधामा (सर्व कल्याणाचे वसतिस्थान असलेल्या), आत्मारामा (आत्मानंद लाभलेल्या) साईनाथा! तुझा जयजयकार असो! हे भक्तविश्रामा (भक्तांचे विश्रांतिस्थान असलेल्या), पूर्णकामा (सर्व इच्छा तृप्त झालेल्या) साईसमर्था! तुला नमस्कार असो. मागच्या अध्यायात साईबाबांच्या थट्टामस्करीची ओळख (परिशीलन) आणि वर्णन झाले. हा भक्तभावन (ज्याला भक्त प्रिय आहेत असा) साई भक्तांना सदा आनंद देत असतो (भक्त+रंजन नित्य करी). तो दयेची परम मूर्ती आहे. भक्त मात्र श्रद्धाळू आणि भावार्थी (भक्तियुक्त अंत:करणाचा) असून त्याची भक्ती अनन्य (एकनिष्ठ) असली पाहिजे. मग त्याला इच्छित वस्तूंची उणीव (न्यून) पडणार नाही. **'सद्गुरू म्हणजे मी स्वत:च (माझी मूर्ती) आहे'** असे श्रीकृष्णाने उद्धवाला (आपल्या प्रिय भक्ताला) भागवतात सांगितले आहे. (**सद्गुरू तोचि माझी मूर्ती। निश्चयेंसी जाण निश्चितीं। विकल्प न धरावा ये अर्थी। अनन्य भक्ति या नांव॥** एकनाथी भागवत, अ. १२, ओ. ४९९) यावर विश्वास ठेवण्यालाच अनन्य (अद्वैत किंवा एकात्मतेच्या भावनेची) भक्ती म्हणतात. माझ्या मनात इच्छा झाली की श्री साईंचे चरित्र लिहावे आणि साईंनी त्यात अति आश्चर्यकारक (अति+अद्भुत) आणि ऐकण्याजोग्या (श्रवण+अर्ह) लीला लिहवून मला निश्चिंत (काळजीपासून मुक्त) केले. तसेच अधिकार नसताना व शास्त्रज्ञानाचे नैपुण्य नसताना (नसता अधिकार+ज्ञान+व्युत्पत्ति) मला पामराला स्फूर्ती दिली आणि आपल्या भक्तांच्या प्रबोधनासाठी (जागृतीसाठी) माझ्या हाताने हा ग्रंथ लिहविला. ''दप्तर ठेवा (कथांचा संग्रह करा)!'' अशी जेव्हा आज्ञा (अनुज्ञा) माझ्यासारख्या अज्ञानी (अज्ञ) माणसाला झाली तेव्हाच माझी मंद बुद्धी (अल्प प्रज्ञा) धैर्य व ज्ञान यांनी संपन्न झाली. तेव्हाच मला धीर आला की हा उत्तम गुणांनी युक्त (गुण+गंभीर) साई आपल्या भक्तांच्या उद्धारासाठी आपल्या कथांचा संग्रह करवून घेईल. असे नसते तर हा वाणीचा खेळ (वाक्+विलास) करण्याचे साहस मला झाले असते का! या चरित्ररूपी अमृताचा रस (सुधा+रस) म्हणजे संतांच्या चरणांच्या प्रसादाचे पायस (शिजविलेल्या भाताची दूध, साखर वगैरे घालून केलेली खीर) आहे. हे श्री साईंचे चरित्र म्हणजे भक्तांसाठी साईंच्या कथारूपी अमृताची पाणपोई (वाटसरूंना पिण्याचे पाणी देण्यासाठी छप्परी इ. उभारून केलेली सोय) आहे. त्यांनी ते यथेच्छ पिऊन साईकृपेने संसाररूपी वणव्याच्या तापाचे (दु:खाचे) (भव+दव+तापा) निवारण करून घ्यावे. हे चरित्र नव्हे; तर हा सोमकांत (चंद्रमणी—ज्यावर चंद्राचे किरण पडले म्हणजे त्याला पाझर फुटतो असा समज आहे) आहे. त्यातून साईकथेचे चंद्रामृत सतत पाझरत असते. तहानेने (साईकथा ऐकण्याच्या तीव्र इच्छेने) व्याकूळ झालेले (तृषा+आकुलित) चकोररूपी भक्त ते मनसोक्त पिऊन तृप्त होवोत. आता प्रेमळ श्रोतेजनहो! कलियुगात उत्पन्न होणाऱ्या दुष्ट वासनांचा नाश करणाऱ्या (कलि+मल+दहन) साईंच्या पवित्र कथा संकोच केल्याशिवाय एकाग्र मन करून ऐका! साईबाबांवर जर का एकदा अनन्य श्रद्धा (निष्ठा) जडली तर ते त्या भक्ताचे सर्व अनर्थ (सकळ अनिष्टा)

दूर करून, सर्व कष्ट निवारून त्याला इच्छित गोष्ट (अभीष्टा) प्राप्त करून देतात. याबद्दलची एक गोष्ट साईंची भक्तवत्सलता दर्शविते. ती जर श्रोत्यांनी आदरपूर्वक ऐकली तर त्यांच्या मनाला आनंद होईल. म्हणून श्रोत्यांनो ! ही नाविन्यपूर्ण कथा जीव लावून ऐका! म्हणजे गुरूमाउली कशी दयेची मूर्तिमंत सागर (दया+अर्णव) आहे याचा अनुभव येईल. ही कथा जरी फार लहान (तोकडी) असली तरी तिच्या तात्पर्यापासून मिळणाऱ्या शिकवणीमुळे (अर्थ+अव+बोधें) फार चांगली (चोखडी) आहे. एक क्षण लक्ष द्या; म्हणजे तुमची सर्व संकटे (सांकडी) बाजूला सरतील. (ओ. १-१७)

अहमदनगरचे दामूअण्णा (कै. दामोदर सावळाराम रासने) नावाचे एक सुखवस्तु धनवंत कासार (काचकार, म्हणजे काचेच्या बांगड्या बनविणाऱ्या आणि विकणाऱ्या) जातीचे भक्त साईंच्या चरणी आसक्त (अनुरक्त) होते. त्या श्रेष्ठ भक्ताची कथा ऐकून श्रोत्यांना आनंद होईल आणि साईबाबांची भक्तांचे रक्षण करण्याची तत्परता त्यांना प्रत्यक्ष दिसून येईल. दरवर्षीच्या रामनवमीच्या उत्सवाच्या वेळी दोन मोठी नवी निशाणे शिरडी गावात मिरवीत निघतात, हे तेथील लोकांना माहीत आहे. त्यातील एक नानासाहेब निमोणकरांचे व दुसरे या दामूअण्णांचे असते. त्यांचा हा कित्येक वर्षांचा भक्तीचा व प्रेमाचा नेम अखंड (अव्याहत) चालू आहे. (पहा, अ. ६, ओ. ५६-५७) दामूअण्णांना दोन स्त्रिया होत्या; परंतु संतती नव्हती. पुढे साईबाबांच्या आशीर्वादाने त्यांना पुत्ररत्न लाभले. (हे पुत्ररत्न म्हणजे शिरडीत अजूनपर्यंत सर्व उत्सवांत दिसणारे व साईबाबांबद्दल अत्यंत निष्ठा असणारे कै. नानासाहेब रासने उर्फ दत्तात्रय दामोदर रासने होत. त्यांचा जन्म अहमदनगर येथे इ.स. १९०० साली झाला व मृत्यू नुकताच २१ जून १९८५ रोजी आषाढी एकादशीच्या पवित्र दिवशी शिरडी येथेच वयाच्या ८५ व्या वर्षी झाला.) या पुत्ररत्नानिमित्त दामूअण्णांनी रामनवमीच्या उत्सवाप्रित्यर्थ निशाणाचा नवस केला आणि तेव्हापासून दरवर्षी निशाणाच्या मिरवणुकीला प्रारंभ झाला. या मिरवणुकीची तयारी कोंडिबा नावाच्या सुताराच्या घरी होते आणि तेथून मग वाद्यांच्या गजरात ही निशाणे गावातून मिरवीत नेतात. मग त्या खूप लांब पताका (निशाणे) मशिदीच्या दोन्ही टोकांना बांधतात. अशाप्रकारे समारंभपूर्वक उत्तम महोत्सव दरवर्षी होत असतो पहा (विलोका)! तसेच तेथे जे फकीरफुकरे (मुसलमानी धर्माचे भिक्षेकरी साधू) येत असत त्यांना मनसोक्त (यथा+इष्ट) जेवू घालून हे दामूशेठ रामनवमीचा नेम चालवीत असत (प्रतिपाळिती). त्या या दामूअण्णांची कथा श्रोत्यांसाठी वर्णन करून सांगतो. ती लक्ष देऊन ऐकली तर साईबाबांच्या सामर्थ्याची त्यांना कल्पना येईल. (ओ. १८-२७)

(वरील ओव्यांत हेमाडपंतांनी 'रामनवमीचा' उत्सव असे जरी म्हटले असले तरी दामूअण्णांचा हा निशाणांचा नेम शिरडीत तेव्हा चालू असलेल्या 'उरूसापासूनचा' होता; कारण दामूअण्णांची पुत्रलाभ होण्याची इच्छा इ.स. १९०० साली पूर्ण झाली आणि रामनवमीचा उत्सव तर अ. ६, ओ. ५९ मध्ये म्हटल्याप्रमाणे शके १८३३, म्हणजे इ.स. १९११ साली सुरू झाला. म्हणूनच वरच्या २६ व्या ओवीत उत्सवात जेवणासाठी आलेल्या गोरगरीबांचा उल्लेख 'फकीरफुकरे' म्हणून केलेला आढळतो व पुढे ओ. १०५ व १०६ मध्ये दामूअण्णांना आश्वासन देताना आपल्या समाधीला (हिंदू संन्याशाला पुरलेल्या जागी बांधलेले स्मारक) 'तुर्वत' किंवा कबर (मुसलमानी शव पुरलेल्या जागी केलेले बांधकाम) असे बाबांनी म्हटलेले आढळते. दामूअण्णांच्या मुंबईच्या व्यापारी स्नेह्यानेही बाबांचा उल्लेख 'फकीर' म्हणूनच केलेला आहे, यात आश्चर्य नाही; कारण इ.स. १९०० मध्ये अजून बाबांच्या हिंदुधर्माप्रमाणे पूजन-आरतीला सुरवात झालेली नव्हती. दामूअण्णांची बाबांवरची भक्तीसुद्धा एक श्रेष्ठ मुसलमानी अवलिया म्हणूनच सुरू झाली असावी. त्या काळी बरेचसे हिंदू आपले इच्छित मनोरथ पूर्ण करून घेण्यासाठी मुसलमान अवलियांकडे किंवा फकिरांकडे धाव घेत असत.)

दामूअण्णांच्या मुंबईच्या एका मित्राने त्यांना पत्र पाठविले, ''उघडउघड स्पष्ट (निव्वळ) दोन लाख नफा होईल असा फायद्याचा व्यवहार (किफायत) आपण करू या. तुमची व आमची भागीदारी ठेवू या. प्रत्येकी एकेक लाख कमवू या. चट्कन (चलाख) उत्तर धाडा! हा धंदा अगदी स्पष्ट (चोख) आहे. त्यात कसली भीती नाही. या खेपेस कापूस-खरेदी करू या. लगोलग भाव वर चढेल. वेळेवर जे सौदा (व्यवहार) साधून घेत नाहीत ते मग मागाहून पश्चाताप पावतात (पस्तावती).'' अशी संधी फुकट जाऊ देऊ नये म्हणून अण्णांच्या मनाची खळबळ उडाली. त्या मित्रावर तर पक्का विश्वास होता; पण निश्चित विचार त्यांना सुचत नव्हता. धंदा करावा की न करावा याचा अण्णांच्या मनाला विचार पडला. काय होईल ? देवा, कसे होईल ? याचा त्यांच्या मनाला गोवा (संशय) पडला. दामूअण्णा साईगुरूंचे शिष्य (गुरुपुत्र) होते. त्यांनी बाबांना पत्र लिहिले, ''आम्हाला स्वतंत्र बुद्धी नाही. आपणच आमचे छत्र (आधार) आहात. प्रथम दर्शनी हा व्यापार करावा असे वाटते; परंतु त्यापासून लाभ होईल का नुकसान, हे कृपा करून सांगा!'' पत्र माधवरावांकडे पाठविले आणि कळविले की हे बाबांना वाचून दाखवा (दावा) आणि काय आज्ञा होईल ती कळवा! मला तर हा व्यवहार (उद्यम) बरा वाटतो. दुसऱ्या दिवशी तिसऱ्या प्रहरी (दुपारी ३-३॥ वाजता) ते पत्र माधवरावांच्या हातात पडले व ते त्यांनी मशिदीत नेऊन बाबांच्या चरणी घातले. तेव्हा बाबांनी विचारले, ''काय शामा ? घाई कसली रे ? कसला कागद (कागुद) पायाशी लावतोस ?'' शाम्याने उत्तर दिले, ''बाबा! तो नगरचा दामूशेठ आपल्याला काही विचारू पाहत आहे.'' बाबा म्हणाले, ''काय बरे, काय लिहितो ? काय, कसले बेत करतो ? मला वाटते, तो आभाळाला हात लावू बघतोय. देवाने दिलेले त्याला पुरेसे वाटत नाही. बरे, वाच, वाच त्याचे पत्र!'' शामा म्हणाला, ''बाबा! आपण म्हणता तसेच खरोखर शब्दश: पत्र दामूअण्णाचे आहे. देवा! आपण येथे स्वस्थ बसता आणि तिकडे भक्ताची अस्वस्थता (खळबळ) उठविता. मग मनाला चुटपुट (तळमळ) लागली की त्याला पायाजवळ आणता. कोणाला स्वत: ओढून आणता तर कोणाकडून पत्र लिहविता. पत्रातील

आशय (मतितार्थ) आधीच सांगता. मग पत्र तरी कशाला वाचविता?'' बाबा म्हणाले, ''अरे शामा! वाच, वाच! माझे काय खरे (साचे) मानू नकोस. मी तर आपला असाच आहे. मनाला येईल ते (माने ते) आपला उगाच बोलत असतो.'' मग माधवराव पत्र वाचू लागले आणि बाबा लक्ष देऊन ऐकू लागले. ऐकल्यावर बाबा कळवळून म्हणाले, ''त्या शेठजीची बुद्धी (मती) चळली आहे. पत्राच्या उत्तरात त्याला सांग की तुला घरात काय कमी (उणें) आहे! आपल्याला अर्धी भाकरी पुरे. लाखाच्यामागे पडू नकोस.'' दामूअण्णा पत्राच्या उत्तराची सारखी (क्षणक्षणा) वाटच पाहत होते. उत्तर येताक्षणीच ते वाचू लागले आणि त्यांचा विरस झाला. त्यांच्या मनोरथाचा किल्लाच (दुर्गच) ढासळला (कोसळून पडला) व आशेचा वृक्षच मुळापासून उपटला गेला. 'आता एक लाख (लक्ष रुपये) कमवू; अर्धा लाख व्याजी लावू; म्हणजे लवकरच लाखोपती सावकार होऊन आनंदात अहमदनगरात राहू', असे जे मनोराज्य केले होते ते जागच्याजागीच विरघळले आणि दामूअण्णा अत्यंत निराश झाले (हिरमुसले). ते मनात म्हणाले, ''हे काय केले बाबांनी! आपण त्यांना पत्र लिहिले हेच चुकले. आपले आपण नुकसान (अनहित) करून घेतले. पाहता-पाहता पुढे आलेले ताट आपणच लाथाडिले (अनादराने स्वीकारिले नाही)''. असो. त्या उत्तरात दामूअण्णांना माधवरावांनी असेही सुचविले (ध्वनित केले) होते की कानात व डोळ्यांत अंतर असते (पत्राने निरोप ऐकविण्यात आणि प्रत्यक्ष सांगण्यात फरक असतो). ही माधवरावांची सूचना वाचून दामूशेठला समक्ष जाणे योग्य (उचित) वाटले. ''न जाणो त्यातच आपले कल्याण असेल. कदाचित परवानगी (अनुमती) देतील'', असा मनात विचार करून अण्णा शिरडीला आले आणि बाबांपुढे लोटांगण घालून जवळ जाऊन (सन्निधानी) बसले. हळूहळू पाय दाबू लागले. परंतु बाबांना विचारण्याचा धीर होत नव्हता (नाही धृती). इतक्यात त्यांच्या मनात कल्पना सुचली (उठली वृत्ती) की बाबांचा नफ्यात भाग ठेवावा (पाती ठेवावी). ते मनात म्हणाले, ''साईनाथा! या सौद्याला (व्यवहाराला) साह्य कराल तर नफ्याचा काही भाग मी आपल्या चरणी अर्पण करीन.'' अशाप्रकारे मनात विचार करीत दामूअण्णा क्षणभर साईंचे चरण मस्तकी धरून बसले. संकल्प-विकल्प (शंकाकुशंका करणे किंवा डळमळित स्थिती असणे) हा मनाचा विशिष्ट स्वभाव (लक्षण) आहे. मनातून दामूअण्णांची चळवळ चालली (व्यापार चालले). भक्त मनात अनेक मनोराज्ये करतात; परंतु त्यांना आपला खरा फायदा (स्वार्थ) कशात आहे हे कळत नसते. एकट्या गुरूलाच भक्ताचे भविष्य, भूत व वर्तमानकाळाचे कल्याण कशात आहे हे ठाऊक असते. आपल्या मनातले विचार कोणी कितीही गुप्त ठेवो, सर्वांतर्यामी साईमहाराज ते मनातले विचार (अंतर्+वृत्त) जाणत असत. जेव्हा कोणी आपल्या मनातला हेतू (हद्+गत) साईंच्या पायी प्रेमाने निवेदन करून पूर्ण विश्वासाने त्याबद्दलची योग्य कार्यवाही (अनुज्ञा) सांगण्याची विनंती करीत असत, तेव्हा साईबाबा त्यांना योग्य तो मार्ग सांगत असत (दावित सत्पथ त्या). हे तर त्यांचे व्रत सर्व भक्तांना ठाऊक होते. जो जो त्यांना अनन्यपणे शरण जात असे त्याची संकटे ते दूर करीत असत (आपदा वारीत तयांच्या). गुरू हाच खरोखरीचा आईबाप (माता-पिता) आहे. अनेक जन्मींचा पालनकर्ता व रक्षणकर्ता (पाता-त्राता) आहे. तोच श्री विष्णू, शंकर (हरि+हर) व ब्रह्माही (विधाता) आहे. (पहा, अ. १८, ओ. २० व २१ आणि त्यावरील टीका) सर्व करणारा व करविणारा (कर्ताकरविता) तोच एक आहे. (ओ. २८-६०)

तान्ह्या लेकराने गोडधोड खायला मागितले तर आई त्याला बाळकडू नावाचे लहान मुलांचे औषध (बोळकडू) पाजते. लेकराने हातपाय आपटले (तडफडू) किंवा ते रडले (रडू) तरी आईच्या प्रेमाचा निर्णय (निवाडा) अगदी ठाम असतो; कारण औषधाच्या (बोळाच्या) कडूपणाचा योग्य वेळी पुढे गुण येत असतो (हे आईला ठाऊक असते); परंतु त्या लेकराला त्या गुणांची (चांगल्या परिणामांची) काय कल्पना! कोणत्या गोष्टी लक्षात ठेवावयाच्या असतात त्या आईलाच (मातेच्या खुणा मातेस) ठाऊक असतात. (ओ. ६१-६२)

अण्णांनी जरी भागीदारी ठेवली तरी बाबा काय त्यामुळे मोहात पडतील (भुलतील)! त्यांचे प्रेम भक्तांकडून काही प्राप्त करण्याच्या अपेक्षेने नव्हते (लाभेवीण तयांची प्रीती). आपल्या भक्तांच्या कल्याणासाठी ते सदा तत्पर असत. ज्यांना संपत्ती व सोने (धन-कनक) मातीसारखे होते त्यांना पाती किंवा भागिदारीच्या हिश्श्याची काय किंमत (किंपदार्थ)! केवळ दीन जनांच्या उद्धारासाठी हे संत जगात अवतार घेतात. यम-नियम (इंद्रिये व मन यांच्या संयमनासाठी करण्याची अष्टांग योगातील पहिली दोन अंगे) व शमदम (मनाचा व इंद्रियांचा निग्रह करण्यासाठी साधनचतुष्टयाच्या षड्संपत्तीपैकी पहिली दोन कृत्ये) यांनी युक्त, मायामात्सर्याचे (कोणावर प्रेम करणे किंवा कोणाचा द्वेष करणे) दोष नसलेला (दोष+विहीन) व केवळ दुसऱ्यावर कृपा (अनुग्रह) करण्यासाठीच (प्रयोजन) ज्याचे जगणे (जीवन) असते तोच संत होय! दामूअण्णांची ही पाती (भागीदारी) त्यांच्या मनातल्या मनात गुप्त होती; परंतु तिच्याबद्दल बाबांनी उघड (प्रगट) काय उत्तर दिले ते आदरवृत्तीने श्रोत्यांनी ऐकावे. जीवमात्राच्या मनातील इच्छा (मनोगत), तसेच त्यांच्या वर्तमान, भविष्य आणि भूतकाळाच्या घटना हाताच्या तळव्यावरील आवळ्याप्रमाणे (जैसा कर+तल+गत आमलक) बाबांना संपूर्णपणे ठाऊक (अवगत) असत. आपल्या भक्तांची भविष्यातील परिस्थिती (भावी स्थिती) बाबा जाणत असल्याने ते त्यांना वेळेवर सावध कसे करीत असत याचे स्पष्ट वर्णन (उक्ती) ऐकावे. ''आपण बुवा कशात नाही (आपण नाही रे बापू किसमें)'' असे म्हणून आपणाला हा व्यवहार बरा वाटत नाही अशी प्रेमाची सूचना बाबांनी दिली आणि दामूअण्णा मनात लाजले. बाबांचे हे शब्द ऐकून त्यांना खूण पटली आणि मनाचा बेत (संकल्प) सोडून ते खाली मान घालून स्वस्थ (अधो+वदन+उगा) बसले. नंतर त्यांच्या मनात आणखी विचार आला की तांदूळ, गहू इत्यादी धान्याचा (भुसार) दुसरा काही व्यापार करावा. त्यावर बाबांचे उत्तर ऐका! ''रुपयाला पाच शेराच्या भावाने घेशील आणि सात शेराच्या भावाने विकशील

(जोपशील). बाबांचे हे बोल ऐकून अण्णा मनात खजील झाले. साईंच्या दृष्टीस न पडे असे कोठेही काहीही घडत नसते. खाली-वर, जिकडे-तिकडे, सर्वत्र त्यांना उघडे (स्पष्ट दिसणारे) असते. (ओ. ६३-७३)

इकडे दामूअण्णांचा मित्र खोल विचारात (विचार+गहनीं) पडला. काय करावे त्याला समजेना. अण्णांचे उत्तरही नव्हते. इतक्यात दामूशेठने त्याला पत्र लिहून घडलेला सर्व वृत्तांत कळविला. तो वाचून त्या मित्राला आश्चर्य वाटले. तो मनात म्हणाला, ''नशिबाचा फेरा (कर्माची गती) किती विचित्र असतो! सौदा चालून आला होता. स्वत:च का विचार केला नाही! फकिराच्या नादी कशाला लागला आणि फुकट लाभ घालवून बसला! **देव देतो कर्म नेतें। होणाऱ्यासारखी बुद्धी होते** (योगायोगाने मिळत असले तरी पूर्वीच्या कर्माचे फळ त्याला ते प्राप्त होऊ देत नाही. त्या कर्माचे फळ म्हणून जसे घडणार असेल तसेच वागण्याची बुद्धी होते.) असा चोख व्यवहार जेथे होता तेथे हा फकीर मध्येच आडवा का यावा? कामधंदा सोडून (व्यवहारावर देऊनी पाणी) जे वेड्यावाणी दारोदार (भाकरीचे) तुकडे मागून पोट भरतात ते सांगून काय सांगतील (योग्य सल्ला कसे आणि कोठून देऊ शकणार)! असो. दामूअण्णाच्या नशिबीच नव्हते म्हणून त्याला अशी बुद्धी झाली. आता आपण दुसरा कोणी भागीदार पहावा. **यदभावि न तद्भावि। भावि चेन्न तदन्यथा॥** (जे घडावयाचे नाही ते घडणारच नाही व जे घडणार असेल ते वेगळ्या तऱ्हेने घडणार नाही, म्हणजे तसेच निश्चित घडेल.)'' असो. अशाप्रकारे दामूअण्णा स्वस्थ बसले आणि ज्यांचे कर्माचे फळ अंगावर पडणार होते (ओढवले) ते त्या मित्राचे (स्नेह्याचे) भागीदार झाले आणि संकटात पडले (आले तपेले गळ्यात). ते सट्टा (पुढे मालाची किंमत चढेल किंवा उतरेल याचा अंदाज बांधून केलेला जोखमीचा व्यवहार) करावयाला गेले; परंतु त्यांचा दिवस उलटा (प्रतिकूल) उगवला. त्यांना दुर्दैवाचा फटका बसला (ठोकर लागली) आणि तोटा झाला (नुकसान झाले). जणूकाय त्या फकिराच्या दंड्याचा मारच (सोटा) बसला (त्या फकिराचे न ऐकल्याने शिक्षा मिळाली). ''आपला दामूअण्णा किती नशिबाचा आणि शहाणा! त्याचा साई खरोखरच उत्कृष्ट माणूस (दाणा) आहे. केवढी त्याची भक्ताविषयी कळकळ! मित्र म्हणून दामूअण्णा माझ्या नादी (फंदी) लागला असता तर चांगलाच फसला असता (नागवता स्वच्छंदी). त्या फकिराच्या नादी लागून बिचारा वाचला. खरोखरीच केवढी त्याची श्रद्धा (दृढ बुद्धी)! त्याच्या वेडेपणाची मी केलेली थट्टा आणि माझ्या शहाणपणाची घमेंड व्यर्थ होती (काही कामाची नव्हती) याचा मला अनुभव आला. त्या फकिराची मी उगीच निंदा केली. तसे न करता मीही त्याच्या नादी लागलो असतो तर मलाही त्याने वेळेवर जागे केले असते आणि ही फसवणूक झाली नसती (न दगा होता हा).'' (ओ. ७४-८५)

आता आणखी एक गोष्ट सांगून दामूअण्णांच्या वृत्तांताला (ग्रंथा) आवरू या. ही गोष्ट ऐकून श्रोत्यांच्या चित्ताला आनंद होईल आणि बाबांचे कौतुक (आश्चर्यता) वाटेल. एकदा पहा असे घडले की गोव्याहून एक पार्सल आले. कोणीतरी मामलेदार राळे या नावाने नामांकित असलेल्या व्यक्तीने आंबे (प्रसिद्ध हापूस) धाडले आणि बाबांच्या पायी अर्पण व्हावेत म्हणून माधवरावांच्या नावाने कोपरगावी स्वीकार होऊन शिरडीला आले. मशिदीत बाबांसमोर उघडता त्यातून सुंदर आंबे निघाले. ते गोड सुवासाने दरवळणारे (मधुर घमघमीत) आंबे तीनशेच्या वर भरले. बाबांनी ते पाहिले आणि माधवरावांजवळ दिले. माधवरावांनी त्यातून चार आंबे कोळंब्यात (मातीच्या पसरट भांड्यात) टाकले आणि बाकीचे बरोबर घेऊन गेले. आंबे कोळंब्यात पडताच बाबा तोंडाने काय म्हणाले ते पहा, ''हे आंबे दामूअण्णासाठी आहेत. तेथेच पडलेले राहू द्या!'' यानंतर दोन तासांनी दामूअण्णा पूजासाहित्य घेऊन मशिदीत आले. पूर्वी घडलेले काही त्यांना माहीत नव्हते. बाबा मोठ्याने बोलू लागले, ''हे आंबे दाम्याचे आहेत. आपले नव्हेत. लोक ते खावयाला टपलेत (लक्ष लावून वाट पहात बसलेत) तरी ज्याचे आंबे त्यानेच खावेत. कोणाची वस्तू आपण का बरे खावी! ज्याचे आंबे असतील त्यानेच ते खावे आणि **खाऊन मरून जावे**.'' (बाबांच्या या भलत्याच आश्चर्यकारक शब्दांबद्दल या अध्यायाच्या शेवटी आणखी टीका पहा!) हा बाबांचा प्रसादच (अनुग्रहच) आहे अशा भावनेने अण्णांनी त्याचा सहजपणे (स्वभावे) स्वीकार केला. भलत्याच किंवा अशुभ (विपरीत) अर्थाला भिऊ नये हे अण्णांना ठाऊक होते. (खरे म्हणजे 'खाऊन मरून जावे' असे बाबांचे शब्द ऐकून त्या आंब्यांचा स्वीकार करताना एखादा येरागबाळ्या भक्त गडबडला असता; परंतु दामूअण्णांची बाबांवर अढळ निष्ठा होती म्हणून त्यांनी ते न कचरता स्वीकारले आणि पुढे त्यांना त्याचे पुत्रसंततीच्या रूपाने फळ मिळाले. कधीकधी बाबा काहीतरी विचित्र बोलून किंवा आज्ञा करून भक्तांच्या श्रद्धेची अशी परीक्षा घेत असत.) नंतर पूजा संपवून (सारोनि) अण्णा गेले; पण पुन्हा येऊन विचारू लागले की हीं फळे कोणाला देऊ कळत नाही. मोठ्या का धाकट्या पत्नीला देऊ? बाबा म्हणाले, ''धाकटीला दे! तिला आठ मुले होतील. चार मुलगे आणि चार मुली ह्या आंब्यांच्या खेळातून जन्माला येतील (आम्र+लीला प्रसवेल)''. पोटी पुत्रसंतान नव्हते म्हणून खूप प्रयत्न करावा, साधुसंतांची सेवा करावी (करावे भजन) आणि त्यांची कृपा व आशीर्वाद मिळवावेत म्हणून दामूअण्णांना साधुसंतांचा नाद लागला होता. तसेच ग्रहांची अनुकूलता (ग्रह+प्रसाद) प्राप्त व्हावी म्हणून त्यांना ज्योतिषशास्त्राचाही छंद जडला होता आणि स्वत:च ते ज्योतिषी झाले होते. नशिबात संततीच नाही हाच ज्योतिषशास्त्राचा अखेरचा निर्णय (निदान) होता, हे अण्णा जाणून होते म्हणून ते निराश होऊन बसले होते; परंतु साईबाबा प्रसन्न झाले आणि त्यांच्या तोंडचे हे आश्वासनयुक्त शब्द ऐकून त्यांना पुन्हा आशा उत्पन्न झाली. असो. पुढे काही काळाने बाबांची अक्षरे सफल झाली आणि संतप्रसादरूपी आंब्यांच्या मोहोराला संततिरूपी फळांचा बहर आला (प्रसवली संतति-फलभरें). बाबा जसे बोलले तसेच घडले. दामूअण्णांचे आपले ज्योतिष खोटे ठरले (निष्फळ झाले). साईंचे बोल अमोघ (हटकून फळ देणारे) ठरले आणि त्यांच्या वचनाप्रमाणे मुले झाली. (ओ.

८६-१०३)

असो. ही बाबांची (अमोघ व आश्वासनयुक्त) वाणी (वैखरी) ते देहधारी असतानाची होती; परंतु पुढे देहत्यागानंतरचासुद्धा आपल्या या वाणीचा महिमा (पुढील शब्द उच्चारून) स्वत:च त्यांनी निश्चित करून ठेवलेला होता (स्वये निर्धारी निजमहिमा). ''झालो जरी गतप्राण (माझा प्राण जरी गेलेला असला तरी) वाक्य माझे माना प्रमाण (माझ्या शब्दांची खात्री बाळगा)! माझी हाडेदेखील माझ्या तुर्वतीमधून (कबर=मुसलमानाचे शव पुरलेल्या जागी केलेले बांधकाम) तुम्हाला आश्वासन देतील. मी काय; पण माझी तुर्वतसुद्धा तुमच्याबरोबर बोलत राहील आणि तिला जो अनन्यपणे शरण जाईल त्याच्याबरोबर ती डोलतसुद्धा (झोके खात) राहील. मी डोळ्याआड होईन याची चिंता करू नका. माझी हाडे बोलताना व तुमच्याशी कानगोष्टी (हितगुज) करताना तुम्ही ऐकाल; मात्र माझे स्मरण करा, अंत:करणात माझ्याबद्दल विश्वास ठेवा आणि निरिच्छपणे (निष्काम) माझे भजन करा, म्हणजे आपले कल्याण साधलेले (कृत+कल्याण) व्हाल.'' (ओ. १०४-१०८)

(बाबांची ही वाक्ये आठवून हेमाडपंत भारावून जातात आणि प्रार्थना करतात) ''हे भक्तांच्या इच्छा पुरविणाऱ्या, कल्पवृक्ष असलेल्या (भक्त+काम+कल्प+तरो) सर्वशक्तिमान (समर्थ) साई सद्गुरो! तुझ्याकडून नानातऱ्हेने दयेची हीच याचना करतो (भाकी परोपरी हे करूणा) की या हेमाडपंताला तुझ्या चरणांचा वियोग न घडो (चरणा न अंतरो)! हे भक्तजनांवर करूणा करणाऱ्या गुरुवरा! आमच्या मदतीला धावून ये (धांव पाव) आणि आम्हाला पलीकडल्या काठावर (पैल+तीरा) नेऊन पोहोचीव! या संसारात जराही विश्रांती (उसंत) लाभत नाही. जन्ममरणांच्या खेपा (येरझारा) आता पुरे. मनाला वाटेल तसे वागणाऱ्या (स्वभाव+प्रवृत्ति+परा) व संसारातील विषयांचाच विचार करीत असणाऱ्या (बाह्य+विषय+आलोचन+तत्परा) आम्हाला या विषयभोगांपासून परत फिरवा (आवरा) आणि आमची वृत्ती अंतर्मुख करा (निवृत्तीमार्गाकडे वळवा)! या संसार (भव) सागरात आम्ही लाटांप्रमाणे सैरावैरा (वाट फुटेल तिकडे) वाहत चाललो आहोत. वेळीच हात देऊन या संसारातून सोडवा ना आम्हाला (भव+निर्मुक्त करा कीं)! इंद्रिये स्वच्छंदेने मोकाट सुटून अनीतीने वागण्याकडे (दुराचारा) प्रवृत्त होत आहेत. या अनियंत्रितपणे (उच्छृंखल = उत्+शृंखल म्हणजे सांखळी तुटल्याप्रमाणे) वाहणाऱ्या नदीला बांध घाला (थांबवा) आणि इंद्रियसमूहाला माघारी फिरवा! जोपर्यंत इंद्रिये अंतर्मुख होत नाहीत तोपर्यंत आत्मा समोर दिसत (सन्मुख होत) नसतो आणि जोपर्यंत आत्मा समोर दिसत नाही तोपर्यंत सर्वश्रेष्ठ शाश्वत (आत्यंतिक = अति+अंतिक) सुख कोठले! जन्मच फुकट जाईल (निरर्थक होईल). कलत्र (पत्नी), पुत्र किंवा मित्रपंक्ती (मित्रांचा समूह) यांपैकी कोणीही शेवटी कामाला येत नसतात. तूच एक अखेरचा सुख व मोक्ष देणारा सोबती (साथी) आहेस. हे साईमहाराजा! कर्म व अकर्म यांचे पाश (जाळे) सैल करून (उकलून) एक वेळ आम्हाला दु:खावेगळे करा! आपल्या कृपेच्या बळाने या दीन-दुबळ्यांचा उद्धार करा! हे अत्यंत पवित्र अशा साईराया! आपल्या कृपेच्या सामर्थ्याने वादावादीसारख्या वाईट प्रवृत्तींचा (अवकळा) मूळासकट नाश करा (निर्दळा) आणि आमच्या जीभेला (वाणीला) आपल्या नामाचा चाळा (छंद) लागू द्या! मनाला असे प्रेम द्या की ज्यामुळे संकल्प-विकल्प मनात येणारच नाहीत, शरीर व घरदार (देह+गेह) यांचे भानच (आठवणच) राहणार नाही आणि माझा मीपणा पळून जाईल (दवडी) असे करा! फक्त तुझे नामस्मरण घडावे, इतर कसली आठवण न व्हावी आणि मनाला चंचलतेचा स्पर्शही न होवो! तू आम्हाला पोटाशी धरले तर आमची अज्ञानाची अंधारी रात्र (अज्ञान+तम+निशी) मावळेल आणि आम्ही तुझ्या प्रकाशात सुखाने नांदू. मग आम्हाला कसलीही कमतरता (उणे) असेल का! तू जे आम्हाला आपले चरित्ररूपी अमृत पाजलेस आणि थापटी मारून जागे केलेस हे पुण्यकार्य (सुकृत) काय साधेसुधे (सामान्य) आहे का!'' (ओ. १०९-१२१)

पुढील अध्याय याहून गोड असेल व ऐकणाऱ्यांची हौस (कोड) पुरवील. त्यांची साईचरणी आवड वाढेल आणि श्रद्धा चांगली बळकट (सुदृढ) होईल. आपल्या गुरूचे चरण सोडून शिरडीत दर्शनाला आलेले एक भक्त बाबांच्या चरणांना वंदन करीत असताना बाबांनी त्यांना त्यांच्या गुरूच्या चरणी दृढ केले. तसेच दुसरे एक श्रीमंत; परंतु संकटग्रस्त पत्नी व मुलासकट साईंच्या दर्शनाला आले असताना त्यांचा मनोद्गय (हेतू) कसा पुरविला, अपस्माराने (फेंफऱ्याने) पिडलेल्या त्यांच्या मुलाला नुसत्या दर्शनाने रोगमुक्त कसे केले आणि पूर्वी झालेल्या दृष्टांताची (प्रत्यक्ष अनुभवाची) आठवण कशी दिली, हे ऐका! हेमाडपंत साईंना शरण येऊन श्रोत्यांना आदरपूर्वक विनवणी करीत आहेत की साईकथा ऐकण्यास आसक्त व्हा आणि कानांचे सार्थक करून घ्या! (ओ. १२२-१२६)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साई समर्थ यांच्या सत्यचरित्राचा **'भक्त–अभीष्ट–संपादनं'** (भक्ताला त्याचे मनोवांछित आणि कल्याण प्राप्त करून देणे) नावाचा पंचविसावा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरू साईनाथांना अर्पण असो.**
**सर्वत्र मंगल असो.**

## अध्याय २५ ची आणखी टीका

(वरील अध्यायातील ओ. ९४ मध्ये बाबा दामूअण्णांसाठी कोळंब्यात ठेवलेल्या आंब्यांबद्दल ''मरूनि जावे खावोनी'' असे भलतेच व आश्चर्यकारक शब्द का म्हणाले व त्याचा अर्थ काय असावा याचा उलगडा

मद्रासच्या कै. प. पू. नरसिंहस्वामींनी त्यांच्या Life of Sai Baba, Vol. III, Ch. 3 मध्ये सुंदरतऱ्हेने केला आहे. ''मरूनि जावे'' हे शारीरिक नव्हे तर आध्यात्मिक मरण समजावयाचे असते. हे मरण म्हणजे लग्नानंतर एकामागून एक संततीच्या जन्ममरणांमुळे व इतर जबाबदाऱ्यांच्या चिंतेमुळे, संसारात खोलवर गुंतून जाण्यामुळे होणारा भ्रम किंवा प्रमाद होय! सनत्कुमार त्यांच्या सनत्सुजातीयात म्हणतात, **''प्रमादो मृत्युरहं ब्रवीमि''** (प्रमादालाच मी मृत्यू म्हणतो). हेमाडपंतदेखील अ. ५२, ओ. १२-१३ मध्ये याचाच अनुवाद करतात: **''प्रमाद मिथ्या ज्ञानाचे कारण। आत्मस्वरूपीं अनवधारण। जेथूनि उद्भवे जनन-मरण। सर्वानर्थनिदान जें॥१२॥ मोह म्हणजे मिथ्या ज्ञान। अनात्मठायीं आत्माभिमान। तोच मृत्यु विद्वज्जन। लक्षण करितात॥१३॥** साईबाबांना आपल्या भक्ताने प्रपंचात गुंतून परमार्थाकडे लक्ष न देणे आवडत नसे. अर्थार्थी, म्हणजे धन किंवा संसारातील इतर सुखसाधने प्राप्त करण्यासाठी भक्ती करणाऱ्या दामूअण्णासारख्या भक्तांच्या इच्छा त्यांच्या हट्टामुळे जरी ते पुरवीत असत तरी त्याबरोबरच ''मरूनि जावे खावोनी''सारखे काही सूचक शब्द बोलून त्यांना ते इशाराही देत असत किंवा आपली नापसंतीही दर्शवीत असत. आपले मूल फार हट्ट करून काही मागू लागले तर त्याची आई त्याला ते देऊन रागाने नाही का म्हणत, ''घे मेल्या! मर जा एकदाचा.'' असो.

याच कै. नरसिंहस्वामींपुढे इ.स. १९३६ मध्ये कै. दामूअण्णांनी जे निवेदन केले ते वाचून या अध्यायातील प्रसंगांबद्दल आणखी काही खुलासा होतो. शाम्याने कोळंब्यात आधी चार नव्हे तर आठ आंबे ठेवले होते. बाबांना लहान मुलांचा फार लळा होता. त्यांना आपल्याभोवती गोळा करून, खायला खाऊ प्रसाद म्हणून देऊन त्यांचे ते फार लाड करीत असत. कधीकधी बाबांचे न ऐकता काही खाद्यवस्तू मशिदीतून ती पळवीत असत; परंतु बाबा त्यांच्या खोड्यांकडे लक्ष देत नसत. कोळंब्यातील सुंदर घमघमीत आंबे पाहून मुले ते मागू लागली. त्यावर बाबा त्यांना म्हणाले की ती दामूशेठकरिता आहेत. मुले म्हणाली, ''ते तर येथे नाहीत! नगरला राहतात!'' बाबा म्हणाले, ''ते यायला निघाले आहेत.'' तरीसुद्धा त्या मुलांनी संधी साधून त्यातील चार आंबे लांबविलेच व कोळंब्यात दामूअण्णांसाठी चारच आंबे शिल्लक राहिले. यावरून अध्यायात बाबा दामूअण्णांना ''धाकटीला आठ मुले होतील. चार मुलगे आणि चार मुली ही आम्रलीला प्रसवेल'', असे का म्हणाले होते याचा अर्थ लागतो. पुढे त्यातील चार मुले मृत्युमुखी पडली (यमराजाने पळविली) आणि चारच जिवंत राहिली याचेही कारण समजते.

दामूअण्णांच्या कुंडलीत पुत्रस्थानात पापग्रह केतू बसलेला होता व त्याला मारक गुरू ग्रहाची कृपादृष्टी नव्हती. त्यामुळे त्यांना पुत्रसंतती-योग मुळीच नव्हता, असा ज्योतिषशास्त्राचा निर्णय होता; परंतु त्यांना साईबाबांसारखे समर्थ गुरू लाभले होते व त्यांच्या कृपादृष्टीने त्या पापी ग्रहाच्या वक्रदृष्टीचे निवारण झाले आणि दामूअण्णांना पुत्रसंतती प्राप्त झाली. यावरून सिद्ध होते की ईश्वराच्या किंवा गुरूच्या बळापुढे ग्रहांचे बळ निर्बल होते. श्री थ्यागराज म्हणतात, **''ग्रह बलमेहि? श्रीरामानुराग बलमेबलम्''** (ग्रहांचे बळ मोठे? अरे! श्रीरामाच्या कृपेचे बळ सर्व बळांहून मोठे.) खरेच, याशिवायच का गोपाळ गुंडांना नशिबात नसताना पुत्रसंतती लाभली असती! (अ. ६) रघुनाथराव तेंडुलकरांचा मुलगा डॉक्टरी परीक्षेत पास झाला असता! (अ. २९) सोलापूरच्या औरंगाबादकरांची पत्नी सत्तावीस वर्षांनंतर पुत्रवती झाली असती! (अ. ३६) याला तुम्ही बाबांचे असामान्य सामर्थ्य (ईशत्व) म्हणा, की त्रिकालज्ञान म्हणा, की सत्यसंकल्पसिद्धी म्हणा, बाबांचे शब्द अगदी खरे ठरत असत, हे मात्र खरे. **''साईमुखीं वदले जें अक्षर। तें तों निर्धार ब्रह्म लेख॥११९॥** अ. ३६''

दामूअण्णांची बाबांबद्दलची भक्ती प्रापंचिक कल्याणासाठी होती (परमार्थाकडे त्यांचे विशेष लक्ष नव्हते). म्हणून त्यांच्या या दोन कथांपासून आपणाला प्रपंचाबद्दल बरेच धडे शिकायला मिळतात.

(१) माणसाने पैसे कमविण्याचा अति लोभ करू नये. **'उत्तम व्यवहारे'** धन जरूर कमवावे. धनाशिवाय या जगात काहीच करता येत नाही. चारही पुरुषार्थांत अर्थ (पैसा कमविणे) हा दुसऱ्या क्रमाचा पुरुषार्थ आपल्या शास्त्रात सांगितला आहे; परंतु तो चट्कन आणि खूप मिळावा म्हणून सट्ट्यासारखे जोखमीचे व्यवहार (त्यात अर्थात जुगार किंवा घोड्याच्या शर्यती खेळणे आलेच) बाबांना पसंत नव्हते. **''पुरे आपुली अर्धी भाकरी। लाखाचे भरी पडू नको.''**

(२) बाबांजवळ आपण काही मागतो आणि ते खूप वाट पाहून मिळाले नाही म्हणजे आपण बाबांवर रागावतो व केव्हाकेव्हा त्यांची भक्त करणेही सोडून देतो. हा मूर्खपणा आहे. बाबा त्रिकालज्ञानी आहेत. त्यांना आपले अंतिम कल्याण कशात आहे हे कळत असते. आपण मुलगा मागितला; पण तो जर लवकरच मरणार असेल, अपंग जन्माला येणार असेल किंवा लग्न झाल्यावर म्हातारपणी छळणार असेल तर तो काय कामाचा!

(३) गुरूला प्रापंचिक विषयांबद्दल प्रत्यक्ष किंवा त्याच्या चित्रापुढे चिट्ठ्या टाकून सल्ला विचारू नये; परंतु जर विचारलाच तर त्याच्या आज्ञेप्रमाणे तंतोतंत वागले पाहिजे; मग ती आज्ञा आपल्या इच्छेविरूद्ध का असेना. दामूअण्णांनी बाबांचा कापसाचा किंवा धान्याचा सौदा न करण्याचा सल्ला ऐकला म्हणूनच त्यांचा धोका टळून त्यांचे कल्याण झाले.

(४) सद्गुरूंवर अनन्य श्रद्धा पाहिजे. त्यांनी काहीही सांगितले, मग ते वरवर दिसायला कितीही विचित्र आणि अपायकारक असले, तरी त्याप्रमाणे वागण्यास आपण कचरले न पाहिजे. बाबांनी दामूअण्णांना आंबे खावून मरून जावे असे म्हटले तरी त्यांनी ते आंबे स्वीकारले व धाकट्या पत्नीला खाण्यास दिले. म्हणूनच त्यांची पुत्रप्राप्तीची इच्छा पूर्ण झाली ना!)

# श्री साईबाबा आणि पुनर्जन्म

**–ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)**

**श्री** साईबाबांचा पेहराव आणि राहणी जरी एखाद्या मुसलमान फकिरासारखी होती तरी त्यांचा मुसलमान धर्म मानीत नसलेल्या पुनर्जन्मावर पूर्ण विश्वास होता; आणि त्यांनी तसे आपल्या हिंदू भक्तांना वारंवार सांगितलेच नाही तर काही चमत्कार घडवून ते पटवूनही दिले.

एकदा अध्याय ३६ मध्ये साईबाबांनी प्रेमोल्हासाने गालगुच्चा घेतल्याने त्यांचा लाडका भक्त शामा रागाचा आव आणून जेव्हा म्हणाला :

**नलगे ऐसा देव खटयाळ।**
**गालगुच्चे जो घेई प्रबळ।**
**आम्ही काय तुझे ओशाळ।**
**सलगीचे फळ हे काय ?॥१३९॥**

तेव्हा त्याला :

**तंव बाबा प्रत्युत्तर देत।**
**"कधीं अवघ्या बहात्तर पिढींत।**
**लाविला रे म्यां तुजला हात।**
**असे कां स्मरत पहा बरें"॥१४८॥**

तसेच अध्याय ५१ मध्ये सांताक्रूझचे धुरंधर बंधु जेव्हा बाबांच्या दर्शनाला शिरडीस प्रथम आले तेव्हा त्या आधीच बाबा म्हणाले होते,

**"आज माझे दरबारचे लोक। येणार आहेत येथे अनेक॥"**

एवढेच नव्हे तर ते आल्यावर त्यांना म्हणाले होते,

**"तुमची आमची साठ पिढ्यांची। ओळख पूर्वीची आहे बरें॥"**

साईबाबांचे दुसरे भक्त नानासाहेब चांदोरकर अहमदनगर येथे कलेक्टरचे चिटणीस असताना साईबाबांनी शिरडीच्या आप्पा कुळकर्णीबरोबर आपणाकडे येण्यासाठी त्यांना तीन वेळा निरोप पाठविला होता. हो ना करता, नानासाहेब शिरडीला आले आणि "मला का बोलाविले ?" म्हणून त्यांनी बाबांना विचारले. त्यावर बाबांनी काय उत्तर दिले ते पहा :

**"अरे जगात एकच का नाना आहे व मी तुलाच का बोलाविले, याचे काही कारण असेलच का नाही ! तुझी व माझी चार जन्माची संगती आहे. तुला माहीत नाही व मला माहीत आहे."**

(श्रीमद्भगवद्गीतेच्या अध्याय ४ मध्ये भगवान श्रीकृष्णांनीही अर्जुनाला असेच म्हटले आहे :

**बहूनि मे व्यतीतानि।**
**जन्मानि तवचार्जुन।**
**तान्यहं वेद सर्वाणि।**
**न त्वं वेत्थ परंतप॥५॥**

माझे आणि तुझे पुष्कळ जन्म होऊन गेले. ते सर्व मी जाणतो; पण हे शत्रुनाशना ! तुला ते आठवत नाहीत.)

अध्याय ३१ मध्ये काही दरवेशी आपल्या रोगग्रस्त वाघाला बाबांपुढे घेऊन आले; परंतु बाबांचे दर्शन होताच त्या वाघाने आपला प्राण सोडल्याने ते दरवेशी आपले चरितार्थ साधन हरवल्याने खिन्नवदन झाले. त्यावर बाबांनी त्यांना जो शांतवनपर उपदेश केला त्यातही पुनर्जन्माचा उल्लेख आढळतो :

**गतजन्मीचा देणेदार।**
**फेडावया ऋण हा अवतार।**
**तुमचिया बंधनी साचार।**
**तो आजवर राहिला॥१६३॥**

अध्याय २७ मध्ये दादासाहेब खापर्ड्यांच्या कुटुंबाने आणलेले नैवेद्याचे ताट बाबांनी उत्कंठित मनाने आसनावरून उठून कफनीच्या अस्तन्या वर सारून खाण्यासाठी ओढून घेतलेले पाहून जेव्हा शामराव देशपांड्यांनी त्यांना या पक्षपाताचे कारण विचारले तेव्हा बाबांनी त्यांना उत्तर दिले :

**बाबा म्हणती सांगूं काई।**
**काय या अन्नाची अपूर्वाई।**
**पूर्वी ही एक वाण्याची गाई।**
**दुधाळ लई लठ्ठ असे॥१५९॥**

**मग ती कुठें नाहींशी झाली।**
**माळियाकडे जन्मास आली।**
**तीच पुढे क्षत्रियाकडे गेली।**
**पत्नी झाली वाणियाची॥१६०॥**

**पुढें ही उपजली ब्राह्मणापोटीं।**
**बहुत काळानें पडली दृष्टी।**
**प्रेमाचे दोन घांस पोटीं।**
**सुखसंतुष्टी जाऊं दे॥१६१॥**

अशाप्रकारे या बाईच्या जन्मोजन्मीची हकिगत सांगून बाबांनी एखाद्या जीवाची पशुयोनीतून संतसंगतीमुळे हळूहळू ब्राह्मणासारख्या पुण्य योनीत प्रगती होऊ शकते हे तर नाही ना दाखवून दिले ! असो.

श्री साईबाबा त्रिकालज्ञानी होते. त्यामुळे त्यांनी 'बाबू' नावाच्या मुलाच्या जन्मोजन्मीची माहिती सांगून व त्याबद्दल प्रत्यक्ष पुरावे देऊन मनुष्य पुन्हा पुन्हा जन्म घेतो, हे सर्वांना पटवून दिले होते. ही कथा मद्रासच्या कै. बी. व्ही. नरसिंहस्वामीजींनी आपल्या 'Devotees' Experiences of Sri Sai Baba या पुस्तकात वर्णन केली आहे; ती अशी :

रा. ब. साठे यांचे सासरे दादा केळकर यांचा बाबू हा पुतण्या होता. बाबांनी दादासाहेब खापर्डे यांना बाबूच्या अनेक जन्मातल्या हकिगती सांगितल्या; त्या अशा :

"शिरडीला एक वृद्ध व धार्मिक निष्ठेचा गृहस्थ १२ वर्षे रहात होता. त्याची पत्नी व मुले जालन्यास रहात होती. ते सारखे याला जालन्यास येण्याबद्दल आग्रह करीत होते. शेवटी घोड्यावर बसून तो निघाला व मी बैलगाडीतून निघालो. काही काळाने या वृद्ध गृहस्थाने आपल्या भावाच्या तरूण मुलीबरोबर लग्न केले व त्याला एक मुलगा झाला. तो ६ वर्षाचा असताना त्याचे वडील वारले. पुढे त्या मुलावर नातेवाईकांनी विषप्रयोग करून त्याला मारले. त्याच मुलाचा पुढील जन्म म्हणजे दादा केळकरांचा पुतण्या बाबू व या बाबूचा पुढील जन्म मुंबईत होणार आहे."

दादा केळकरांचा हा पुतण्या बाबू मोठा झाला होता व त्याचे लग्नही झाले होते. त्याच्याबद्दल दादा केळकरांचे जावई रा.. ब. साठे यांनी खालील माहिती दिली आहे.

मी एकदा कोपरगाव व येवला तालुक्यांचा असिस्टंट सुप्रिटेंडंट ऑफ रेवेन्यु सर्वे म्हणून काम करीत असताना माझ्या हाताखाली लिमये काम करीत होते. त्यांच्या हाताखाली

माझ्या सासऱ्यांचा पुतण्या बाबू हा मोजणीदाराचे काम करीत असे; पण त्या कामाकडे दुर्लक्ष करून तो शिरडीला जाऊन बाबांच्या सेवेत मग्न असे. त्याची वारंवार व सतत गैरहजेरी असे. याबद्दल लिमयांनी माझ्याकडे तक्रार केली. ती तक्रार माझ्या सासऱ्यांच्या कानावर घातल्यावर ते म्हणाले,

''काय करावयाचे? बाबू बाबा सांगतील तसे करतो.''

पण थोडयाच दिवसात काय घडणार हे माहीत असल्याने बाबा म्हणाले,

''त्याची नोकरी गेली खड्डयात! त्याला माझी सेवा करू दे!''

आणि बाबूही निरंतर त्यांच्या सेवेत असे. आलेल्या नैवेद्यापैकी उत्तमोत्तम पक्वान्ने बाबा त्याच्यासाठी काढून ठेवीत व त्याला आग्रहाने खाऊ घालीत. हे बघितल्यावर लिमये यांनी त्याला मोकळीक दिली. १९१० साली बाबूचा अंतसमय निकट आला. काही दिवसांनी पत्नीला मागे ठेवून वयाच्या २२व्या वर्षी बाबूचे निधन झाले.

याच वर्षी सांताक्रूझचे रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान त्यांच्या पत्नी व मेहुणीसह शिरडीला बाबांच्या दर्शनाला गेले. प्रधानांच्या पत्नीकडे बोट दाखवून माधवराव देशपांड्यांना बाबा म्हणाले,

''ही बघ माझ्या बाबूची आई!''

पण प्रधानांची पत्नी नव्हे तर मेहुणी गरोदर असल्याने तिलाच उद्देशून बाबांचे उद्गार असावेत असे वाटून नानासाहेब चांदोरकरांनी बाबांना विचारले,

''बाबा हीच ना (प्रधानांची मेहुणी)?''

त्यावर बाबांनी प्रधानांच्या पत्नीकडे पुन्हा बोट दाखविले व म्हणाले,

''नाही. ती नाही ही.''

या घटनेनंतर खरोखरच बरोबर एका वर्षाने प्रधानांच्या पत्नीने एका मुलाला जन्म दिला. प्रधानांनी त्याचे बारसे मोठ्या थाटात केले आणि त्याचे नावही 'बाबू' ठेवले. बाबू चार महिन्याचा झाल्यावर प्रधान पत्नी व बाबूला घेऊन जेव्हा शिरडीला गेले तेव्हा बाबूला जवळ घेऊन बाबा म्हणाले,

''बाबू, कोठे गेला होतास? माझा कंटाळा आला होता काय?''

नंतर बाबांनी खिशातून दोन रुपये काढून बर्फी आणावयास सांगून ती सर्व मंडळींस वाटली. ही घटना १९१२ सालची आहे. त्यावेळी बाबा म्हणाले,

''बाबूचा सुंदर बंगला तयार आहे.''

आणि खरोखरीच प्रधानांकडून सहा महिन्यातच एक बंगला विकत घेतला गेला व १९१३ साली बाबूच्या पहिल्या वाढदिवसाला सुंदर बंगला मिळाला.

या बाबूच्या कथेवरून वाचकांना पुनर्जन्माबद्दल पूर्ण विश्वास वाटून बाबा आपल्या भक्तांची जन्मोजन्मी काळजी घेतात हे नाही का पटत!

पुनर्जन्माचे आपले विचार सांगत असताना साईबाबांनी पुढचा जन्म चांगला की वाईट आपल्या कर्माप्रमाणे येतो हेही वारंवार सांगितले आहे:

**जैसें जैसें जयांचे कर्म।**
**पावती जन्म तदनुरूप॥२३॥**

**'यथाकर्म यथाश्रुत'।**
**शुक्रबीज समन्वित।**
**कांहीं योनिद्वारीं प्रवेशत।**
**स्थावर भावाप्रत कांहीं॥२४॥**

**'यथाप्रज्ञं हि संभवा:'।**
**श्रुत्यर्थ नाही कवणा ठावा।**
**जन्म घेणें तरी तो घ्यावा।**
**रूचेल जीवा जो जैसा॥२५॥**

**जाणा हे मूढ अविद्यावंत।**
**शरीरग्रहणालागीं उद्यत।**
**जैसे जयाचें उपार्जित।**
**शरीर प्राप्त तैसें तयां॥२६॥**

म्हणून साईबाबा सर्वांना या जन्मी सदा **'नेकीने'** (प्रामाणिकपणाने) वागावयास उपदेश करीत असत. ते म्हणत:

**जैसी जिसकी नियत, वैसी उसकू बर्कत.**

अध्याय १४ मध्ये प्रजापतींचा देव, दैत्य व मानव या आपल्या तीन अपत्यांना केलेला 'द' हा एकाक्षर उपदेश आलेला आहे.

**बाबाही दकारें भक्तांप्रत।**
**भक्तहितार्थ तेंचि मागत।**
**करा दया दान व्हा दान्त।**
**सौख्य अत्यंत लाधाल॥१४६॥**

ऋण, हत्या आणि वैरवृत्तीबद्दल तर बाबांनी ताकीदच दिली आहे:

**त्यातही वैरवृत्तीचा वारा।**
**कदाकाळींही नव्हे बरा।**
**तयापासाव मनासी आवरा।**
**करील मातेरा जन्माचा॥३१॥**

**परस्परवैराचा परिणाम।**
**उत्तमाचा जन्मे अधम।**
**ऋण-वैर-हत्यांचा धर्म।**
**फिटे तों जन्मपरंपरा॥३२॥**

आणि त्यासाठी अ. ४६ मध्ये दोन शेळ्यांची पूर्वजन्माची कथा आणि अ. ४७ मध्ये सर्प व बेडूक यांच्या तीन जन्मांची कहाणी सांगून बाबांनी आपल्या भक्तांना तो धोका टाळण्यास सुचविलेही आहे.

एवढेच नव्हे तर नरजन्म (मनुष्ययोनीत जन्म) पुन्हा येईलच याची खात्री नसल्याने या जन्मीच आपले कल्याण साधावयाचा उपदेश ते सतत करीत असत:

**अनंत पुण्याईच्या बळें।**
**अवचटें जीवा नरदेह मिळे।**
**त्यांतही परमार्थ जया आकळे।**
**भाग्ये आगळें ते एक॥१७॥**

**तेथेंही जो करीना सार्थक।**
**जन्मला भूभार तो निरर्थक।**
**पशूहूनि काय अधिक।**
**जगण्याचे सुख तयाला॥१८॥**

**आहार निद्रा भय मैथुन।**
**यांहूनि कांहीं न जाणे जो आन।**
**तो नर केवळ पशूसमान।**
**पुच्छ-विषाणाविरहित॥१९॥**

—अध्याय १४

**म्हणूनि झाले न जों शरीरपतन।**
**आत्मज्ञानार्थ करा यत्न।**
**नरजन्माचा एकही क्षण।**
**उपेक्षून टाकू नका॥७८॥**

—अध्याय ८

शेवटी पुढचा जन्म न येण्यासाठी व जन्ममरणाच्या फेऱ्यापासून सुटका करून घेण्यासाठी एक नामी उपाय श्री साईसच्चरिताच्या ३१ व्या अध्यायात सांगितला आहे:

**अंतकाळीं जैसी मति।**
**तैसी प्राण्यांस लाभे गति।**
**किडे भीतीनें भ्रमर होती।**
**हरिणप्रीती जडभरत॥६॥**

**अंतकाळीं जें जें ध्यान।**
**तें तेंच रूपें पुनर्जनन।**
**भगवत्पदीं झालिया लीन।**

**जन्मविहीन होई तो॥७॥**

(श्रीकृष्ण भगवानांनी गीतेत अ. ८ मध्ये अर्जुनाला हेच सांगितले आहे:

**यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम्।**
**तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावित:॥६॥**

अंतकाळी मनुष्य ज्या ज्या भावाचे स्मरण करीत देह सोडतो तो त्याच भावात सदा रंगून गेल्यामुळे त्यालाच पावतो.

**अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।**
**य: प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशय: ॥५॥**

आणि अंतकाळी जो माझेच स्मरण करीत देह सोडतो तो माझ्याच स्वरूपाला पावतो यात संशय नाही.)

यासाठी ऐनवेळी गांगरून जाऊ नये व आठवण राहावी म्हणून नामस्मरणाचा सतत अभ्यास करण्यास सांगितले आहे. परंतु आयुष्यभर जागृत राहूनही मृत्यूसमयी आधिव्याधींनी गांजून गेल्याने व पत्नीपुत्रांच्या मोहात अडकल्याने माणसाचे मन भलतीकडेच भरकटणे शक्य आहे. म्हणून सुजाण भक्त आपल्या अंतिम गतीची योजना आपल्या सद्गुरूच्या हातीच सोपवून मोकळे होतात. याबद्दल बाळकराम मानकर, तात्यासाहेब नूलकर व मेघा, तसेच एका क्रूर वाघानेही शिरडीला पोहोचून बाबांच्या चरणी देह सोडून आपला उद्धार कसा करून घेतला हे आपण वाचलेच आहे:

**दृष्टीपुढें संतचरण।**
**असतां जया प्राणिया मरण।**
**धन्य देह तो कृष्णार्पण।**
**पुनर्जनन नाहीं त्या॥१४८॥**

**संतांचिया दृष्टीसन्मुख।**
**मरण नव्हे तें वैकुंठसुख।**
**जिंकिला तेणें मृत्युलोक।**
**न पुनर्भवशोक तया॥१४९॥**

—अध्याय ३१

सारांश, साईबाबांनी माणसाला आपल्या कर्मांचे फळ भोगण्यासाठी पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या योनीत जन्म घ्यावा लागतो हे तर सांगितलेच; पण त्याबरोबरच पुढचा जन्म चांगला येण्यासाठी किंवा तो येऊच नये यासाठी काय करावे हेही उदाहरणांसह भक्तांना समजावून सांगितले.

---

(पृष्ठ क्र. ८ वरून)

## कारणब्रह्म

**वाङ्मय: सदसद्रूप:कारणं प्रकृतेपर:॥४६॥**
**जगदात्मा जगद्योनिर्जगदन्ते।**
**ह्यनन्तक:॥५५॥ ह.स.ना.**

हे हनुमंता! रामायणांतील तुझें वर्णन हें कार्यब्रह्माचेंच स्वरूपवर्णन होय. उपास्य आणि उपासक हें द्वैत कार्यब्रह्माचें ठिकाणीं संभवतें. हें जरी खरें आहे. तरी वस्तुत: कार्यब्रह्माचे रूपांत कारणब्रह्माचीच उपासना इष्ट असते. कार्यकारण हीं एकरूपच असलीं तरी कार्यकारण परंपरेंत कारणाचेंच महत्त्व जास्त असतें. रामायणांतील तू आणि रावण दोघेहि कार्यब्रह्मच. पण तुझ्या जीवनचरित्राचें सूत्र कारणब्रह्माशीं जडलेलें दिसतें. किंबहुना कारणब्रह्माची कल्पना तुझ्या ठिकाणीं संभवते, तशी रावणाचे ठिकाणीं सुसंगत वाटत नाहीं. रावणरूप अहंकार आपला आत्मसत्तेशीं असलेला संबंध जणूं तोडून तो उपाधीशीं जोडताना दिसतो. उलट कांचेच्या हंडींतील ज्योतीप्रमाणें तुझ्या ठिकाणीं तुझ्या भक्तांस रामरूपच दिसतें. रामायणांतील राम हें निर्गुण ब्रह्म व सीता ही अव्यक्त माया मानली म्हणजे रामायणरूप लीलाकैवल्यांत तूच व्यक्तरूपांत ठळकपणें पुढें दिसतोस. ''नभासारखें रूप या राघवाचें'' असें समर्थ म्हणतात. त्या अदृश्य व अव्यक्त आकाशांत अखिल विश्वाची जी प्राणज्योत संचरली, तेंच तुझे कारणरूप आहे.

हे वायुनंदना! वायूपासून स्वत: ब्रह्मदेव झाला; वायूपासून स्वत: हरि झाला व वायूपासून महादेव झाला. तात्पर्य सर्व जगत् वायुमय आहे. वायूवांचून सर्व मृत होत असून वायूच्या योगानेंच सर्व जिवंत राहतात.

हे वायुदेवा! श्रीसमर्थ रामदास म्हणतात

**वायो जाणीव जगज्ज्योती।**
**तयास मूळमाया म्हणती।**
**पुरूष आणि प्रकृती।**
**याचेंच नांव॥६७॥**

**वायोस म्हणती प्रकृती।**
**आणि पुरूष म्हणती जगज्ज्योती।**
**पुरूष–प्रकृति शिव–शक्ति।**
**याचेंच नांव॥८॥**

**वायोमध्यें जाणीव विशेष।**
**तोची प्रकृतीमध्यें पुरुष।**
**ये गोष्टीचा विश्वास।**
**धरिला पाहिजे॥९॥**

**वायो शक्ति जाणीव ईश्वर।**
**अर्धनारी नटेश्वर।**
**लोक म्हणती निरंतर।**
**येणे प्रकारें॥१०॥ दा. बो. १०/९**

हे महारूद्रा! हे जे मायामहेश्वराचें रूप, ते तुझ्या ठिकाणीं एकवटलें आहे. अव्यक्त परमात्म्याचें रूप तुज कारणाचेंही कारण असेल. पण या ब्रह्माण्डाचें क्रियात्मक जे आद्यव्यक्त स्वरूप, तेंच तुझें तात्विक स्वरूप असें मी मानतों. सीताशुद्धी या उपलक्षणात्मक कार्याचा आद्यप्रेरक प्रभू राम असेल. पण तें कार्य हे तुझेंच व्यक्त स्वरूप आहे.

हे मारुते! निरनिराळ्या देव-देवतांचीं पृथ:क पुराणें आहेत. त्या पुराणांतून ती ती देवता मुख्य कारणब्रह्मरूप मानली असून बाकीचे सारे देव कार्यब्रह्मरूप मानलेले आढळतात. तुझे असे स्वतंत्र पुराण माझ्या ऐकिवांत नाहीं. पण हे हनुमंता! हा जो संवादरूपी ग्रंथ मीं आरंभिला आहे, त्यांतील मुख्य कारणब्रह्मरूप तूच आहेस. रामायण या उपलक्षणात्मक विश्वाच्या बीजरूप मनाचें रेत अंजनारूप प्रकृतीच्या स्वाधीन झाले व तेंच कारण कार्यब्रह्मरूप झालें. तेंच वन आणि वानरापर्यंत अवतरण पावेल. मूळ निश्चल ब्रह्मांत जें प्रथम चांचल्य उत्पन्न झालें, ब्रह्मांचे ठिकाणीं एकोऽहम् अशी जी प्रथमवृत्ति उत्पन्न झाली, तेंच तुझे कारणात्मक वायुरूप होय.

हे रामदूता! पुरुष राम निष्क्रिय व अशोकवनप्रकृति जड. त्यांचा परस्परांसंबंधी जो अत्युत्कट भाव अथवा सापेक्ष संबंध, तेंच तुज कारणब्रह्माचें रूप होय.

या अंकाचे मुखपृष्ठ **अजय लॅमिनेटर्स** यांनी साईसेवेच्या रूपाने लॅमिनेशन करून दिले आहे. आम्ही त्यांचे शतश: आभारी आहोत. श्री साईंचे कृपाछत्र त्यांच्यावर सदैव राहो, ही श्री साईचरणी प्रार्थना.

# तुमचं नशीब तुमच्या हातात

(मागील अंकावरून)

—पंडित ग. रा. सावंत

रविरेषेला लहान लहान रेषा छेदीत असतील, तर शत्रूकडून त्रास होतो. रेषेच्या सुरूवातीस त्या छेदीत असल्यास तारूण्यात किंवा बालपणात आई-वडिलांच्या संपत्तीचा नाश झालेला असतो.


रविरेषेचा फाटा आरोग्यरेषेस मिळत असेल तर व्यापारात व कलेत यश व फायदा सुचवितो.

धनरेषेतून रेषा येऊन रविरेषेस मिळत असेल तर भागीदारीपासून फायदा होतो. पण तीच रेषा जर छेदीत असेल तर अपयश येते.

मस्तकरेषेतून रेषा निघून रविरेषेला मिळत असेल तर व्यक्तीच्या बुद्धिमत्तेमुळे आर्थिक लाभ होतो. पण तीच रेषा रविरेषेला छेदीत असेल तर आर्थिक नुकसान होते.

शुक्रावरून येणारी रेषा, आयुष्यरेषेतून वर जाणाऱ्या रेषेस छेदून रविरेषेस मिळत असेल तर दाव्यात यश मिळते. पण तीच जर छेदील तर नुकसान सुचविते.

**आरोग्यदर्शन !**




करतळावरील आयुष्यरेषेच्या खालोखाल मापनाचे काम बुधरेषा करीत असते. या रेषेला आरोग्यरेषा, स्वास्थ्यरेषा, प्रकृतीरेषा, किंवा व्यवसायदर्शकरेषा असे म्हणतात. ही रेषा हातावर मुळीच नसेल तर शरीरप्रकृती चांगली निरोगी असते. ही रेषा हातावर दु:चिन्हयुक्त आणि वाईट स्वरूपात असण्यापेक्षा, हातावर नसलेली चांगली. म्हणजे ती चांगल्या स्वरूपाची असेल तर ती शुभफलदायी ठरते.

या रेषेच्या उगमस्थानाविषयी हस्तसामुद्रिक तज्ञांमध्ये बरेच मतभेद आहेत. काही जणांच्या मते ही रेषा बुधग्रहस्थानावर उगम पावून ती अंत:करणरेषा, आयुष्यरेषा यांना ओलांडून तळव्याच्या पायथ्याशी व मनगटाच्या मध्याशी येऊन स्थिरावते. पण माझ्या अनुभवावरून ही रेषा मणिबंध, शुक्रग्रहस्थान, धनरेषा, जीवनरेषा किंवा मधूनच कुठूनही उगम पावली, तरी तिची वाटचाल करण्याची दिशा बुधग्रहस्थानाकडेच असते.

जर हातावर आयुष्यरेषा चांगल्या स्वरूपाची नसेल आणि आरोग्यरेषा चांगल्या स्वरूपात असेल तर मनुष्यास अपचनाचा त्रास होतो.

आरोग्यरेषा जाड व आखूड असल्यास वृद्धपणात अपचनाचे विकार होतात.

आरोग्यरेषा सरळ व अस्पष्ट असल्यास वागणुकीत ठिसूळपणा असतो.

आरोग्यरेषा तांबडी असल्यास अभिमान व पाशवी गुण असतात. आरोग्यरेषा सुरूवातीस तांबडी असल्यास हृदयाची धडधड असते.

आरोग्यरेषा बारीक असून, मध्यंतरी तांबडी असेल तर पित्ताचा विकार असतो.

मस्तकरेषेच्या जवळही रेषा तांबडी असेल तर ताप असलेली प्रकृती असते. या रेषेला ओलांडताना ही तांबडी असेल तर मेंदूत रक्तस्त्राव होण्याची भीती असते.

खोल आरोग्यरेषा मस्तकरेषेवर जाऊन थांबत असेल व पुन्हा हृदयरेषेपुढे सुरू होत असेल तर व्यक्तीस मेंदूचे विकार होतात व ताप येतो.


दुबळी जीवनरेषा, अस्पष्ट मस्तकरेषा, जीवनरेषेच्या शेवटी गुणकचिन्ह असे असल्यास दुबळी प्रकृती असून आरोग्य वाईट असते.

भाग्यरेषा व आरोग्यरेषा लांब पण वाकड्यातिकड्या असतील तर दंतविकार होतो.

आरोग्यरेषा तुटक असल्यास दंतविकार होतात व पचनक्रिया चांगली नसते.

आरोग्यरेषा कोठे जाड, कोठे बारीक असल्यास पित्तप्रकृती असते.

आरोग्यरेषा करवतीप्रमाणे असल्यास विश्वासघातकीपणा असतो. काहींना अपस्माराचा विकार होतो. अस्पष्ट




आरोग्यरेषा, मस्तकरेषा, व हृदयरेषा यात थोडे अंतर आणि हृदयरेषा मस्तकरेषेकडे वळलेली असेल तर व्यक्तीला दम्याचा आजार होतो.

अस्पष्ट आरोग्यरेषा व हातावरील इतर रेषा दुबळ्या असतील तर अर्धांगवात होतो.

अस्पष्ट व अनियमित आरोग्यरेषा व अरूंद मस्तकरेषा अपचन व कमी प्रतीचे कर्तृत्व दर्शवितात.

तुटक आयुष्यरेषा व मस्तकरेषेवर काळे ठिपके असतील, तर गंभीर स्वरूपाचा आजार होतो. पण चांगल्या आरोग्यरेषेमुळे त्यातून व्यक्ती वाचते.

चांगली आरोग्यरेषा व लहान आयुष्यरेषा असता व्यक्तीचे आयुष्य वाढते.

सरळ पण आयुष्यरेषेला न जोडलेली आरोग्यरेषा व चांगल्या मणिबंधरेषा व्यक्तीला दीर्घायुषी करतात.

चांगल्या आरोग्यरेषेबरोबर, भाग्यरेषा व रविरेषा चांगल्या असल्यास, नेहमी सुख मिळून प्रत्येक कामात यश व उन्नती होते.

चांगले बुधग्रहस्थान असून आरोग्यरेषा चांगली असता बोलण्यात व कृतीत चौकसपणा असतो.

आरोग्यरेषा थांबते त्याठिकाणी तांबडी असल्यास डोकेदुखी असते.

आरोग्यरेषा वाकडीतिकडी असल्यास पित्तविकार व अप्रामाणिकपणा आणि धंद्यात अपयश सुचविते.

आरोग्यरेषेवर अनेक बेटे आणि अरूंद पण फुगीरट नखे क्षयरोग होणार असे सूचित करतात.

आरोग्यरेषेच्या सुरूवातीस बेट असल्यास झोपेत चालणे व बडबडणे होते.

आरोग्यरेषेवर बेट आणि रविरेषा किंवा धनरेषा लहान लहान रेषांनी छेदलेल्या असल्यास व्यक्ती दिवाळखोर असते.

आरोग्यरेषा व मस्तकरेषा या ठिकाणी एकमेकीस छेदतात तेथे नक्षत्र असल्यास संतती धारणेस विरोध असतो. म्हणजे संतती होत नाही.

आरोग्यरेषेवर नक्षत्रचिन्ह असल्यास संतती नसते. गर्भधारणेस विरोध होता किंवा बाळंतपणात फार त्रास होतो.

आरोग्यरेषेजवळ (जीवनरेषेच्या बाजूने) नक्षत्रचिन्ह असल्यास आंधळेपणा येतो.

आरोग्यरेषा संपताना तिच्यावर गुणकचिन्ह आणि मस्तकरेषा किंवा हृदयरेषा रविग्रहस्थानाखाली तुटलेली असल्यास आंधळेपणा येतो.

आरोग्यरेषेवर गुणकचिन्ह असता व्यक्तीच्या जीवनात गंभीर स्वरूपाचा फरक होतो.

आरोग्यरेषेवरील आडव्या रेषा आजारीपणा, अपचन व धंद्यात नुकसान दर्शवितात. आरोग्यरेषा जीवनरेषेशी जोडत असेल व जीवनरेषेवर तांबडा किंवा निळा बिंदू असेल तर हृदयविकार, अपचन किंवा यकृतवात या दोघांपासून त्रास सुरु होतो.

मस्तकरेषा, आरोग्यरेषा व भाग्यरेषा त्रिकोण तयार करीत असतील तर गूढशास्त्राची आवड असून अंत:स्फूर्ती असते.

मंगळाच्या ग्रहस्थानाकडे आरोग्यरेषा मस्तकरेषेशी स्पष्ट गुणकचिन्ह करीत असेल, तर गूढशास्त्राची आवड असते.

आरोग्यरेषेवर यव असल्यास व्यक्ती झोपेत बडबडते.

जीवनरेषा व मस्तकरेषा यांच्याशी आरोग्यरेषा चांगला त्रिकोण करीत असेल, पण पायाकडे आयुष्यरेषेशी मिळत असेल तर निसर्गाविषयी व गूढशास्त्राविषयी आवड असते.

भाग्यरेषा व आरोग्यरेषा मस्तकरेषेशी त्रिकोण करीत असतील तर मनुष्य दूरदर्शी शास्त्रीय ज्ञानाचा चिकित्सक असून त्यात तो यशस्वी होतो.

आरोग्यरेषा सुरूवातीस शृंखलायुक्त असेल व तेथे नक्षत्र असेल आणि आरोग्यरेषा तुटक असेल तर लहानपणी त्वचाविकार होतात.

आरोग्यरेषा तुटक असून आयुष्यरेषेवर यव, गुणकचिन्ह व बिंदू किंवा नक्षत्र असल्यास व्यक्तीला अपचनाचा विकार असतो. अशा व्यक्ती धंद्यात अपयशी ठरतात.

आरोग्यरेषेतून रविग्रहस्थानावर शाखा

गेल्यास धंद्यात बदल होतो.

आरोग्यरेषेला बुधग्रहस्थानावर मेख झाल्यास वृद्धपणात भास होतो.

आयुष्यरेषेला लहान लहान रेषा छेदीत असतील व आरोग्यरेषा मस्तकरेषेशी थांबत असेल तर मेंदूचे विकार होतात.

आरोग्यरेषेवर नक्षत्रचिन्ह असल्यास गुप्तरोग होतात. काही वेळा त्यासाठी ऑपरेशने करावी लागतात.

आरोग्यरेषेवर गुणकचिन्ह असल्यास शरीरस्वास्थ्य चांगले नसते.

मणिबंधाकडून आरोग्यरेषा सरळ बुध ग्रहस्थानाकडे जात असेल तर चांगली पचनशक्ती व धंद्यात चांगले यश मिळते.

आरोग्यरेषेवर व मस्तकरेषेवर यव असून नखे वाईट असतील तर क्षयरोग होतो.

मस्तकरेषा धंद्याकडे जात असून आरोग्यरेषा छेदून तिला फुलीसारखी होत असेल तर उद्विग्न, विचारमग्न व विचारशक्ती असते.


## अंतर्ज्ञानदर्शन !

करतळावर चंद्रग्रहस्थानावर उगम पावून अर्धवर्तुळाकार गतीने बुधग्रहस्थानावर स्थिरावलेल्या किंवा कांही वेळा फक्त चंद्रग्रहस्थानावर अर्धवर्तुळाकार असलेल्या रेषेला अंतर्ज्ञानरेषा म्हणतात. ही रेषा हातावर असता व्यक्तीला अंतर्ज्ञानाने सर्व समजते. अशा व्यक्तीच्या ठिकाणी इतरांवर प्रभुत्व स्थापण्याची शक्ती मोठ्या प्रमाणात असते. त्यांच्या बोलण्याची इतरांवर सहज छाप पडते व ते सहजपणे त्यांच्या अंकीत होतात. ही रेषा हातावर असता व्यक्ती महायोगी असते. तिला गूढशास्त्राची आवड असते.

डाव्या हातावरच ही रेषा असेल तर गूढशास्त्राची आवड आनुवंशिक असते.

हाताचा तळवा मृदु नसेल त्यावरील प्रमुख रेषा सामान्यप्रतीच्या असतील आणि अंतर्ज्ञानरेषा शाखायुक्त असेल किंवा वेडीवाकडी असेल तर मनुष्य अप्रामाणिक असतो.

हातावर अंतर्ज्ञानरेषा असून, मस्तकरेषा व हृदयरेषा यांच्यामध्ये शनिग्रहस्थानाखाली फुलीचिन्ह असल्यास स्फूर्ती असते व असामान्य गूढशास्त्राचे ज्ञान असते.




ही रेषा स्पष्ट असून चंद्रग्रहस्थानावर उठावदार असेल तर जादूची किंवा मोहिनी विद्येची शक्ती असते.

ही रेषा चंद्रग्रहस्थानावरून निर्दोष अशी बुधग्रहस्थानावर गेलेली असेल व ती दोन्ही हातावर असेल तर व्यक्ती अंतर्ज्ञानी असते.

अंतर्ज्ञानरेषेवर गुणकचिन्ह असेल अथवा अंतर्ज्ञानरेषा उत्तम असून, गुरूग्रहस्थानावर गुणकचिन्ह असेल तर व्यक्ती विख्यात महात्मा असते.

ही रेषा वाकडीतिकडी असून शाखायुक्त असेल व मंगळग्रहस्थान उठावदार असता मन बेचैन असते.

ही रेषा मस्तकरेषा व धनरेषा यांच्याशी त्रिकोण करीत असेल तर गूढशास्त्राची फार आवड असते.


शुक्रग्रहस्थानावरून रेषा येऊन या रेषेला छेदीत असतील तर नातेवाईक व्यक्ती प्रगतीस अडथळा करतात.

चांगली अंतर्ज्ञानरेषा हातावर शनि व शुक्रकंकणे किंवा हातावर उत्तम त्रिकोण अगर चांगले गुरूग्रहस्थान व त्या ठिकाणी फुली अथवा चौकोन असल्यास मनुष्यास ईश्वरी साक्षात्कार झालेला असतो.

अंत:करणरेषेवर एखादे तीळचिन्ह असेल तर अशी व्यक्तीची आध्यात्मिक शक्ती कलंकित होऊ शकते.

## विवाहदर्शन !

बुधग्रहस्थानाखाली, करंगळीच्या खालच्या बाजूस आडव्या असणाऱ्या विवाहरेषा स्त्री-पुरूषातील परस्परांचे आकर्षण सुचवितात. विवाहामुळे व्यक्तीच्या जीवनाला कलाटणी मिळते. त्याचे जीवन बदलते. म्हणूनच विवाह कधी होणार आहे ? असा प्रश्न नेहमी हस्तरेषातज्ज्ञाला विचारला जातो. हातावर विवाहरेषा नसल्यास विवाह होणार नाही, असे सांगणे म्हणजे एक प्रकारचा वेडेपणा आहे. व्यक्तीला आपल्या सुखदु:खाला कुणीतरी भागीदार हवा असतोच. हल्लीच्या काळात स्त्री-पुरुष एकत्र काम करीत असल्याने अनेकदा सहवासातून विवाह होतो. आजच्या नवीन




पिढीत, घटस्फोट विभक्तपणा, अनैतिक-संबंध यांच्या निदर्शक रेषा स्त्री-पुरूषांच्या हातावर अलीकडे सापडू लागल्या आहेत.

विवाह दाखविणारी रेषा हातावर एकच नसते तर काही व्यक्तीच्या हातावर त्या तीन-चारही आढळतात. म्हणून अशा व्यक्तीचे विवाह तितकेच होतील असे समीकरण मांडता येत नाही. तर या रेषा स्त्रीसुख दाखविणाऱ्या किंवा विवाहयोग दाखविणाऱ्या असतात.

बुधग्रहस्थानावर हृदयरेषेला समांतर सरळ व स्पष्ट असणारी विवाहरेषा, सुखी विवाह दर्शविते. ही रेषा जेवढी लांब सरळ व स्पष्ट असेल तेवढ्या प्रमाणात ती सुखी विवाह सुचविते.

काही वेळा ब्रह्मचारी व्यक्तीच्या हातावर या रेषा आढळून येतात. याचा अर्थ प्रत्यक्ष विवाह झाला नाही. किंवा स्त्रीसुख मिळाले नाही. तरी त्या व्यक्तीस एखाद्या स्त्रीविषयी त्याचप्रकारची अभिलाषा होती व तो ते सुख घेऊ इच्छीत असूनही त्यास ते मिळालेले नसते. परंतु त्या व्यक्तीच्या जीवनावर त्या स्त्रीने (स्त्री असल्यास पुरूषाने) फार मोठा परिणाम केलेला असतो.

विवाह कोणत्या वर्षी होईल असे पाहावयाचे असल्यास अंत:करणरेषा आणि करंगळी यांच्यातील अंतर ७० वर्षाचे मानून मधील अंतराचे ५ भाग करावे व काळ ठरविताना करंगळीकडून सुरूवात करावी. जर विवाहरेषा करंगळीच्या जवळ असेल तर विवाहयोग लवकर येतो. याउलट ती अंत:करणरेषेच्या जवळ असेल तर विवाह उशिरा होतो.

काही वेळा अशी उदाहरणे आढळतात की प्रत्यक्ष जनदृष्टीने विवाह झाला नसतो. पण दोघेही विवाह न करता एकमेकांशी प्रामाणिक असतात. अशा व्यक्तींच्या हातावर विवाहरेषा आढळते.

विवाहरेषेच्या सुरूवातीस मेख झालेली असेल तर त्या व्यक्तीच्या चुकीमुळे विवाहानंतर विरह होतो. किंवा वेगळे राहावे लागते.

विवाहरेषा रविरेषेला मिळत असेल तर श्रीमंत किंवा प्रसिद्ध व्यक्तीशी विवाह होतो. विवाहरेषा रविरेषेला छेदीत असेल तर विवाहापासून नुकसान होते.

ही रेषा जर वाकडी होत असेल तर ती व्यक्ती विवाह करणार नाही.

विवाहरेषा हळूहळू हृदयरेषेकडे कललेली असेल तर जीवनसाथीचा आजारीपणा फार काळ टिकणारा असतो.

विवाहरेषेला मेख असून खालची शाखा रविरेषेला छेदीत असेल तर नुकसान होते.

विवाहरेषेला मेख होऊन तिची वरची शाखा रविग्रहस्थानावर जात असेल तर सुखी व फायदेशीर विवाह होतो.

विवाहरेषा खाली वाकून शुक्रग्रहस्थानावर जात असेल तर घटस्फोट किंवा वेगळेपणा घ्यावा लागतो. दोन्ही हातावर हे चिन्ह असल्यास व्यक्ती खात्रीने घटस्फोट घेते.

विवाहरेषेला मेख झाली असून, तिची एक शाखा अंत:करणरेषेकडे गेलेली असेल. तर घटस्फोट किंवा विभक्तपणा आपल्या मनाप्रमाणे होतो.

विवाहरेषा संपताना तिला मेख झाली असेल तर जोडीदार किंवा सहचारिणी यांच्यापासून वेगळेपा किंवा विरह होत असतो.

विवाहरेषा अनेक बेटांची असल्यास किंवा तिच्या खाली अनेक शाखा असल्यास व्यक्ती नपुंसक असते.

विवाहरेषेवर बेट व मध्यमेच्या दुसऱ्या पेरावर बेट असल्यास व्यक्तीच्या जवळच्या माणसाशी अथवा नातेवाईकांशी विवाहसंबंध होतो किंवा अनैतिक संबंध असतो.

विवाहरेषा बुधग्रहस्थानापर्यंत गेलेल्या नसतील तर उपत्स्यांच्या दर्शक समजायच्या असतात.

विवाहरेषेवर बेट असल्यास व्यक्तीच्या अनैतिक संबंधामुळे भांडणे होतात.

विवाहरेषा अंत:करणरेषेकडे कलत असेल व कलण्याच्या बिंदूकडे गुणकचिन्ह असेल तर व्यक्तीचा विवाहाचा साथीदार किंवा सहचारिणी एकाएकी मरते.

विवाहरेषेवर काळा बिंदू असल्यास विधवापणा किंवा विधुरावस्था प्राप्त होते.

करंगळीकडून विवाहरेषेला एक रेषा छेदीत असेल तर ते विवाहसौख्याला मारक असते. विधवा स्त्रीच्या हातावर हे चिन्ह पाहावयास सापडते.

धनरेषा, मस्तकरेषा, अंत:करणरेषा व मेख असलेली विवाहरेषा यांना एक रेषा छेदीत असेल तर घटस्फोट होतो.

शुक्रग्रहस्थानावरून रेषा निघून जीवनरेषेतून वर जाणाऱ्या रेषेला छेदून, विवाहरेषेला छेदीत असेल तर कोर्टातर्फे वेगळेपणा होतो.

शुक्रावरून रेषा निघून जीवन, मस्तक, अंत:करण व विवाह या रेषांना छेदीत असेल तर विवाहाला नातेवाईकांकडून अडचण येते.

विवाहरेषा तुटलेली असल्यास वेगळेपणा किंवा घटस्फोट होतो.

विवाहरेषा तुटलेली असून, परत तिच्याजवळ दुसरी रेषा जात असेल तर वेगळेपणा झाल्यावर पुनश्च एकी होते.

विवाहरेषेतून लहान लहान रेषा अंत:करणरेषेकडे येत असतील तर विवाहाच्या जोडीदाराच्या आजारपणामुळे त्रास होतो.

विवाहरेषा करंगळीकडे जर वाकलेली असेल तर विवाह होत नाही.

चंद्रग्रहस्थानावर चांगली रेषा निघून शनिरेषेस मिळत असेल तर विवाह समारंभ थाटाने होतो व सासऱ्याकडून पैसे मिळतात.

दोन्ही हातावर गुरूग्रहस्थानावर गुणकचिन्ह असल्यास पती किंवा पत्नी श्रीमंती घराण्यातील मिळतात.

चंद्रग्रहस्थानावरून रेषा येऊन धनरेषेला मिळत असेल त्यावेळी विवाहयोग असतो.

या चंद्रावरून येणाऱ्या रेषेवर यव असल्यास दुसऱ्या माणसाकडून विवाहात अडथळा निर्माण केला जातो.

अंत:करणरेषेच्या मध्यभागी किंवा त्याखालील बुधाच्या बाजूस बोटाच्या खाली जाणाऱ्या शाखा असल्यास किंवा शुक्रग्रहस्थानावर गुणकचिन्ह असेल तर पत्नीपासून किंवा पतीपासून विरह होतो.

विवाहरेषेच्या सुरूवातीस यव असल्यास थोडा काळ वैवाहिकसुख भोगल्यावर जवळच्या माणसाकडून त्यात अडथळा निर्माण केला जातो व व्यक्तीला दु:खी व्हावे लागते.

स्त्रीच्या तर्जनीच्या पहिल्या पेऱ्यावर गुणकचिन्ह असल्यास व गुरूग्रहस्थान चांगले असल्यास ती स्त्री पतिव्रता असते.


अंत:करणरेषा शनिग्रहस्थानावर जाऊन थांबत असेल, तर पती पत्नीवर अविश्वास दाखवितो.

विवाहरेषेवर नक्षत्रचिन्ह असल्यास आकस्मिक वैधव्य किंवा विधुरावस्था सुचविते.

करंगळीच्या पहिल्या पेरावर गुणकचिन्ह असल्यास विवाह मुळीच होत नाही.

विवाहरेषा हातावर दोनपेक्षा अधिक असून त्या तोंडाशी दु:शाखी झाल्या असतील तर मनुष्य वारंवार प्रेमाच्या भानगडीत गुरफटतो.

## संतती रेषा !




हस्तरेषातज्ज्ञाकडे येणाऱ्या व्यक्ती जे महत्त्वाचे प्रश्न विचारतात त्यात संतती हा महत्त्वाचा प्रश्न हस्तरेषातज्ज्ञाला विचारला जातो. साधारणत: संततीचा विचार करताना हस्तरेषातज्ज्ञाने पतीपत्नीचे दोघांचेही हात पाहून ज्या रेषा दोन्ही हातावर सारख्या येतील तितकी संतती सांगावी.

बुधग्रहस्थानाच्या बाहेरच्या बाजूस करंगळीच्या मुळात हाताच्या किनाऱ्यावर उभ्या अशा ज्या लहान लहान रेषा दिसून येतात. त्या रेषांना संतानरेषा म्हणतात. त्यापैकी ज्या सरळ आणि लांब असतात, त्या पुत्रसंतती दाखवितात. या उलट ज्या लांबीने आखूड असतील त्या कन्यासंतती दर्शवितात.

या रेषा करंगुळीच्या मुळापासून खाली उतरलेल्या असतात पण त्या जर थोड्या वरील बाजूस करंगळीतून उगम पावू शकतील तर संतती दीर्घायुषी होते.

दोन्ही हातावर या रेषा दुश्चिन्हविरहीत स्पष्ट असल्यास मुले सशक्त व दीर्घायु होतात. आई किंवा वडील यापैकी जी व्यक्ती

जास्त प्रेमळ असते. त्या व्यक्तीच्या हातावर या रेषा असून सहज मोजता येतात.

बहुधा पुत्रसंतती दर्शविणाऱ्या रेषा हातावर उभ्या व सरळ असतात व कन्यासंततीच्या रेषा वळलेल्या असतात.

संतानरेषेवर वर्तुळचिन्ह असेल तर संतती जन्मांध होते.

संतानरेषेवर यवचिन्ह असल्यास ते संततीच्या मृत्यूचे सूचक असते.

या रेषेवर चौकोनचिन्ह असल्यास जन्मसमयी ऑपरेशन करावे लागते. पण त्यातूनही संतती सुखरूप रहाते.

संततीरेषा जर मुळाशी अगर टोकाशी दुशाखी असेल तर जुळी संतती होते.

संततीरेषा खंडित असेल तर संतती आजारी असते.

आयुष्यरेषेतून निघालेली रेषा विवाहरेषेस येऊन मिळत असेल आणि संतानरेषेवर चौकोनचिन्ह असेल तर मुलाच्या जन्माच्यावेळी मातेला फार त्रास होतो व तिच्या जीवाला धोका असण्याची शक्यता असते.

आयुष्यरेषेपासून निघालेली रेषा बुधग्रहस्थानावर जाईल व तेथे जर या रेषेवर यवचिन्ह असेल तर जन्मलेले मूल निर्बुद्ध किंवा वेडे असते.

काही वेळा हातावर या रेषा नसतात. अशा वेळी अंत:करणरेषा खाली व मंगळटेकडीच्या बाजूस तळहाताच्या काठावर ज्या आडव्या रेषा असतात त्या रेषांना संतानरेषा मानता येतात. हे काम फार कठीण असते.

हृदयरेषेच्या मुळाशी शाखा फुटून त्या मंगळग्रहस्थानावर जातील तर त्यांचाही विचार संतानरेषा म्हणून करता येतो.

याशिवाय अंत:करणरेषेच्या टोकाशी बारीक बारीक शाखा निघालेल्या आढळतील. तर त्याचा विचार संतानदर्शक रेषा म्हणून करता येतो.


अंगठ्याच्या मुळाशी जेवढे यव असतात तेवढीच संतती होते. मोठे यव पुत्रसंतती व लहान यव कन्यासंतती दर्शवितात.

योगी पुरूषांच्या हातावरही संततीरेषा दिसून येतात. पण त्या त्यांच्या संतानरेषा नसून शिष्यसंख्या दर्शविणाऱ्या असतात.

अंगठ्याच्या मुळाशी अराणाऱ्या संततीरेषा जाड व लांब अरातील तर पुत्रसंतती दर्शवितात व आखूड रेषा कन्यासंतती दर्शवितात.

करंगळीचे दुसरे पेर व शनिच्या बोटाचे दुसरे पेर यावर असणाऱ्या, उभ्या रेषा, प्रभावी व पराक्रमी संततीच्या कारक असतात.

## शनि व शुक्र दर्शनरेषा !




शनिबोटाच्या खाली असलेल्या शनिग्रहस्थानाला जी रेषा अर्धवर्तुळाकार किंवा काहीशा सरळ अवस्थेत घेर करणाऱ्या अर्धचंद्र वर्तुळाला शनिकडे, शनिमुद्रिका, शनिचे वर्तुळ अथवा शनिरेषा असे म्हणतात. काही हातावर ही रेषा गुरूग्रहस्थानापासून रविपर्यंत गेलेली आढळते. हातावर ही रेषा असता व्यक्तीला बऱ्याच अशुभ फलांची प्राप्ती होते. थोडक्यात शनिरेषा हातावर असणे हे वाईटच. यात शंका नाही. परंतु हातावरील इतर लक्षणे जर प्रभावित असतील तर शनिरेषेच्या व्यक्तीच्या जीवनावर होणारा परिणाम हा सौम्य स्वरूपाचा असतो.

शनिवलय मध्यभागी अथवा जागोजागी खंडीत असेल व शुक्रटेकडीवर गुणकचिन्ह असेल तर व्यक्ती स्त्रियांच्या मोहात सापडते.

भाग्यरेषा शनिवलयात लुप्त झाली असेल तर व्यक्तीचे आयुष्य दैन, दारिद्र्य व हलाखीने भरलेले असते.

शनिवलय हातावर असून शनिग्रहस्थानावर जर जाळीचिन्ह असेल तर मनुष्य भाग्यहीन व्यभिचारी असतो.

शनिवलय हातावर असून शनिग्रहस्थानावरून आडव्या रेषा असतील तर अशी व्यक्ती असत्यवादी व मलीन आचार-विचारांची असते.

हातावर शनिवलय असणारी व्यक्ती धैर्यहीन व भित्री असते.

हे वलय हातावर दिसत असेल तर

व्यक्ती स्वभावाने फार चंचल व मनात वाळूचे बंगले बांधणारी असते.

ही रेषा हातावर असते तेव्हा अशी माणसे अतिशय संशयग्रस्त असतात.

शनिवलय हातावर असेल तेव्हा व्यक्ती केवळ स्वत:चा स्वार्थ बघणारी असते.

शनिवलय हातावर असून शनिग्रहस्थानावर एखादे गुणकचिन्ह असेल तर व्यक्तीला चांगले शरीरस्वास्थ्य मिळत नाही.

हे वलय हातावर असून शनिग्रहस्थानावर नक्षत्रचिन्ह असेल तर फार मोठ्या संकटाची सूचना करते.

शनिवलयाच्या आत शनिग्रहस्थानावर एखादे त्रिकोणचिन्ह असेल तर अशी व्यक्ती जारणमारण प्रयोग करणारी असते.

शनिवलय हातावर असून शनिग्रहस्थानावर जर एखादा त्रिकोण असेल व त्या त्रिकोणात एखादे नक्षत्रचिन्ह असेल तर अशा व्यक्तीचा खून होतो.

शनिवलय बऱ्याच ठिकाणी खंडीत झाले असेल व शुक्रग्रहस्थानावर गुणकचिन्ह असेल तर अशी व्यक्ती भिन्नलिंगी व्यक्तीच्या मोहात पडते. त्यामुळे तिच्या जीवनात बरीच गुंतागुंत निर्माण होते.

शनिवलय हातावर स्पष्ट व उठावदार दिसत असेल तर मनुष्य ब्रह्मनिष्ठ असून ईश्वर साक्षात्कारी असतो.

हे वलय हातावर पूर्णपणे निर्दोष असता व्यक्ती आत्मज्ञानी असून तिला ईश्वर साक्षात्कार झालेला असतो.

शनिवलय हातावर असून अंगठा फारच लहान असून कललेला असेल व दोन्ही मंगळ ग्रहस्थानें दुबळी असतील तर व्यक्ती आत्महत्या करते.

शनिवलय हातावर असून आरोग्यरेषेवर यवचिन्ह असेल तर व्यक्ती अन्यायाच्या प्रतिकारास असमर्थ ठरते.

शनिवलय हातावर असून मस्तकरेषा जर सरळ चंद्रग्रहस्थानावर गेली असेल तर अशी व्यक्ती अस्थिर विचारांची व कल्पनेत वावरणारी असते.

शनिवलय हातावर असून जर हृदयरेषा दुबळी असेल तर अशी माणसे स्वत:चा आत्मविश्वास गमावून बसतात.

**शुक्रवलय :** तर्जनी व मध्यमा या बोटांच्या मधून निघून सूर्य व बुध बोटांच्या मध्ये जाणाऱ्या रेषेला शुक्रवलय अथवा शुक्रकंकणरेषा म्हणतात.

काही व्यक्तींच्या हातावर ही रेषा अर्धवर्तुळाकारअसते. कित्येक जणांच्या हातावर ही रेषा त्याचं मूळ ठिकाणी पण आडवी गेलेली आढळते व काहींच्या हातावर तीन-चार रेषा मिळून जसा गळ्यात एखादा तीन-चार पदरी हार घालावा तशा हाराप्रमाणे वर्तुळाकार आढळतात.

कित्येक हातावर ही रेषा धनरेषेला मिळालेली असते. काही लोकांच्या हातावर ही रेषा शनिग्रहस्थानाखाली हृदयरेषेच्या बाजूस झुकलेली दिसते. ही रेषा करतळावर निरनिराळ्या स्थितीत अथवा निरनिराळ्या प्रमाणात दृष्टीस पडते.

शुक्रकंकणरेषा ही शनिग्रहस्थानाच्या खालील भागातून निघून बुधग्रहापर्यंत जात असेल तर अशी व्यक्ती कामुक व वासनायुक्त असते. ही व्यक्ती रात्रंदिवस लैंगिक सुखाच्या कल्पनेत रमून जाते.

शुक्रकंकणरेषा बुधग्रहस्थान ओलांडून बाहेर जात असेल तर मनुष्य भयंकर दुष्ट कामे करणारा असतो.

जर शुक्रकंकणरेषेने शनि, गुरू व सूर्य ही तीनही ग्रहस्थाने रेषांकित केल्या असतील तर अशी रेषांकित ग्रहस्थाने मनुष्यास फार उन्नतीकारक जातात.

शुक्रकंकणरेषा केवळ आपल्या उदयस्थानी थोडीशी दिसत असेल तर मनुष्य चंचल मनाचा, कोमल अंत:करणाचा, चिंताग्रस्त व उदास मनाचा असा असतो.

जर शुक्रकंकणरेषा गहिरी, स्पष्ट व लालरंगाची असून, हृदयरेषेच्या बाजूने जात असेल तर मनुष्य नि:स्पृह व हरहुन्नरी असतो.

शुक्रकंकणरेषा एकाखाली एक अशा तीन किंवा चार संख्यायुक्त असून, तुटक असेल तर अशी व्यक्ती अतिशय कामुक असते.

शुक्रकंकणरेषा जर विवाहरेषेला मिळत असेल तर व्यक्ती नपुंसक होण्याची शक्यता असते.

ही रेषा विवाहरेषेला स्पर्श करीत असेल तर अशा स्त्री-पुरुषांना जननेंद्रियविषयक रोग निर्माण होऊ शकतात.

शुक्रकंकणरेषा हातावर असणारी माणसे स्वभावाने चंचल अशी असतात व त्यांच्यात चिडचिडेपणा येतो.

शुक्रकंकणरेषेवर यवचिन्ह असल्यास अशी व्यक्ती प्रेमप्रकरणात मारली जाते.

शुक्रकंकणरेषा अंत:करणरेषेला स्पर्श करीत असेल तर अशा व्यक्तीला हृदयरोग होतो.

शुक्रकंकणरेषा आरोग्यरेषेला स्पर्श करीत असेल व शुक्रग्रहस्थान फार प्रभावी असेल तर अशी व्यक्ती फार सेक्सी असते. त्यामुळे तिला अनेक प्रकारचे रोग जडतात.

शुक्रकंकणरेषा खंडित असेल तर अशी स्त्री किंवा पुरूष आपल्यापेक्षा खालच्या दर्जातील व्यक्तीशी अनैतिक संबंध ठेवते.

शुक्रकंकणरेषा जाड, गडद व लाल रंगाची असेल तर अशी व्यक्ती स्त्रीलंपट, व्याभिचारी व अतिकामी असते. शिवाय आपला अनैतिक संबंध लपविण्यात फार हुशार असते.

शुक्रकंकणरेषा एकाखाली एक अशा तीन स्पष्ट दिसत असतील तर मनुष्य दुर्गुणी होतो.

## मणिबंधरेषा आणि मंगळरेषा !


दोन्ही हाताच्या मनगटावर ज्या आडव्या रेषा दिसतात. त्यांना मणिबंधरेषा असे म्हणतात. मणिबंधरेषा या मनगटावर विशेषत: तीन दिसून येतात. काही हातावर या दोन किंवा चारही असू शकतात.

हातावर तिन्ही चांगल्या मणिबंधरेषा असता त्या यश व संपत्तीसूचक असतात.

या रेषा वाईट असल्यास, अपचन व आरोग्य चांगले नसणे या गोष्टी सुचवितात.

पहिली मणिबंधरेषा शृंखलायुक्त असल्यास, अतिशय मेहनतीनंतर जीवनात यश मिळते.

मणिबंधातून रविकडे जाणारी रेषा कीर्ति




व प्रवास यांची सूचक असते.

मणिबंधातून बुधावर जाणारी रेषा व्यक्तीला आकस्मिक धनलाभ सुचविते. तिला प्रवासही फायदेशीर होतो.

मणिबंधातून आयुष्यरेषेला छेदणाऱ्या रेषा प्रवासात मृत्यू सुचवितात.

तिन्ही चांगल्या मणिबंधरेषा यश व संपत्तीसूचक असतात.

पहिली मणिबंधरेषा हातावर असेल तर लौकिक कार्यात त्रास सुचविते.

मणिबंधावर नक्षत्रचिन्ह असल्यास वारसा मिळतो. पण हे चिन्ह वाईट हातावर अनैतिकपणा सुचविते.

मणिबंधावर फुली असून सभोवार त्रिकोण असल्यास व्यक्तीला नशिबाने भाग्य मिळते.

आरोग्यरेषेला मणिबंधाकडून येणारी वाकडीतिकडी रेषा छेदीत असेल, तर जीवनात अल्प यश मिळते.

पहिल्या मणिबंधरेषेच्या मध्यावर फुली असल्यास जीवनात अडचणी असतात. पण शेवट गोड व सुखाचा होतो.

मणिबंधरेषेवर तीळचिन्ह असल्यास व्यक्तीला पोटाचे विकार होतात.

तसेच मोठ्या आर्थिक व्यवहारामध्ये अशा व्यक्तीला अपघाताचे भय असते.

**मंगळरेषा :** जीवनरेषेशी समांतर मंगळ व शुक्रग्रहस्थानावरून निघणाऱ्या रेषेला मंगळरेषा असे संबोधले जाते. ही रेषा हातावर असता जीवनरेषा तुटलेली असेल तर तो दोष किंवा जीवनरेषेवर असलेले इतर दोष या रेषेमुळे दूर होतात. व्यक्ती स्वाभिमानी असते. आयुष्याला दीर्घत्व लाभते.

मंगळरेषा जर आयुष्यरेषेपर्यंत लांब असेल तर व्यक्ती मेहनतीने पुढे येते.

आयुष्याच्या उत्तरार्धात आयुष्यरेषेशी समांतर असणारी मंगळरेषा जन्मभूमीपासून दूर मृत्यू सुचविते.

जीवनरेषेबरोबर काही काळ मंगळरेषा असल्यास, जीवनाच्या काळखंडात आयुष्याला दृढ आधार असतो.

मंगळरेषा व जीवनरेषा या दोन्ही रेषा करतळावर प्रभावी असून हातावरील दोन्ही मंगळग्रहस्थाने उठावदार असतील तर व्यक्ती धाडसी असते.

मंगळरेषा मंगळावरून निघून शुक्रग्रहस्थानावर येऊन पोहोचत असेल तर अशी व्यक्ती दीर्घायुषी असते.

हातावर दोन मंगळरेषा असतील व जीवनरेषा सुदृढ असेल तर अशी व्यक्ती कामुक असते.

मंगळरेषा लाल व रूंद असल्यास व्यक्ती कामुक असते.

जीवनरेषा संपत असेपर्यंत मंगळरेषा असता व्यक्ती रागीट असते. खून करण्याची वृत्ती असते.

मंगळरेषा शाखायुक्त असून एक फाटा चंद्रग्रहस्थानावर जात असेल तर व्यक्ती पाशवी वृत्तीची असते.

मंगळरेषेला जर एखादी रेषा छेदीत असेल तर अशा व्यक्तीला प्रकृतीस्वास्थ्य लाभत नाही.

मंगळरेषेवर जर यव, फुली किंवा तीळचिन्ह असेल, तर वरील चिन्हे व्यक्तीला शारीरिक व्याधी सुचवितात.

मंगळरेषेवर जर यवचिन्ह दिसत असेल, तर व्यक्तीच्या वैवाहिक जीवनात अडचणी निर्माण होतात.

मंगळरेषेवर जर त्रिशूळचिन्ह असेल तर व्यक्तीला भरभराट प्राप्त होते.

मंगळरेषेतील एखादी शाखारेषा जर भाग्यरेषेला छेदीत असेल तर व्यक्तीला आर्थिक खोट खावी लागते.

(क्रमशः)

॥ जो जो मज भजे, जैशा जैशा भावें ॥
तैसा तैसा पावें, मीही त्यासी ॥

# साईकृपा

॥ तुमचा मी भार वाहीन सर्वथा ॥
नव्हे हें अन्यथा वचन माझें ॥


वर्ष ७१-७२ अंक १२-१ • श्री साईंच्या कृपाप्रसादाचे वार्तापत्र • मार्च-एप्रिल, १९९३

## साईबाबा स्वप्नात दिसले आणि माझे दुःख दूर झाले!



(श्री. संभाजी वारभुवन, गेवराई, बीड यांच्याकडून):

इसवी सन १९८९ साली एका मित्राकडून मला 'श्री साईलीला' नावाचे मासिक मिळाले. ते वाचण्यास सुरूवात केली. मला ते फारच आवडले. मित्राकडून आणखी अंक वाचायला मिळाले. जुने वा फाटके-तुटके का होईनात मला त्यातील श्री साईबाबांच्या लीला वाचण्याची गोडी लागली. इतकी गोडी लागली की मला श्री बाबांवरील नवीन नवीन पुस्तके, मासिके वाचल्यावाचून करमेनासे होऊ लागले. स्टॉलवर, दुकानात, बाजारात श्री साईबाबांवरील पुस्तके, फोटो पाहण्याचे, दिसताच ते घेण्याचे व वाचून काढण्याचे वेड मला लागले. वार्षिक वर्गणी भरून 'श्री साईलीला'चा सभासदही झालो. गळ्यात साई, खिशात साई, किल्ल्यांच्या जुडग्यात साईंची लहानशी तसबीर अशी माझी साईमय अवस्था झाली. साईबाबांची २ फूट X १.५ फूटाची सुंदर व आकर्षक तसबीर मिळविली. ती सर्वांना स्पष्ट दिसेल अशी खोलीत लावली. हळूहळू बाबांबद्दलचा भाव अधिकच दृढ होत गेला. १९८९ पासून चार-पाच वेळा



मी बायको-मुलांसह शिरडीला जावून बाबांचे दर्शन घेतले आहे.

शिरडीला जाताना बाबांनी माणसाच्या रूपात येऊन आम्हाला मार्गदर्शन व सहाय्य केले. १९९१ सालच्या सप्टेंबर महिन्यात मला एकाएकी हिंवताप आल्यासारखे झाले. मुलांनी मला दवाखान्यात नेऊन आणले. डॉक्टरांनी इंजेक्शन व गोळ्या

शिवलिंग' फिरत असलेले व त्यावर उदबत्ती जळत असून त्यातून धूर निघत असल्याचे दिसले.... आणि मी जागा झालो. पहातो तो काय! पिंडरीच्या मध्यभागी पोकळ मांसल भागाला तोंड फुटून, त्यावाटे पू व पिवळे पाणी वाहू लागून, कॉटवरील गादी व अंगावरील चादर बरीच भिजलेली दिसली. मुलीला सांगून अंथरूण-पांघरूण बदलले. पुढे